रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८७ | अंक ३२८ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## आज समुद्राच्या लाटा उसळणार

**मुंबई** : मुंबई, केरळ आणि दक्षिण तामिळनाडूत समुद्रात उंच लाटा उसळणार आहे. या लाटा ०.५ मीटर ते १.५ मीटर उंच असणार आहे. यामुळे ४ मे रोजी रात्री २.३० वाजेपासून ५ मेपर्यंत रात्री ११.३० वाजेपर्यंत अलर्ट भारतीय हवामान विभागाकडून देण्यात आले आहे. मासेमारी करणाऱ्यांनी समुद्रात जाऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे. तब्बल ३६ तासांसाठी अलर्ट जारी करण्यात आला आहे. यंदा मान्सूनदरम्यान २२ वेळा हाईटाइड येण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. जून ते सप्टेंबर २०२४ दरम्यान हायटाईडचा धोका मुंबईतील समुद्रात असणार आहे, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.


# कृषीवल

रायगड, रविवार, दि. ५ मे २०२४

किंमत ४ ₹


## एचडी रेवन्ना यांना अटक

**नवी दिल्ली** : अपहरणाचा आरोप झाल्यानंतर जेडीएस नेते एचडी रेवन्ना यांना एसआयटीच्या पथकाकडून शनिवारी रात्री उशिरा अटक करण्यात आली आहे. त्यांचा मुलगा प्रज्वल रेवन्ना हा सेक्स स्कॅंडल प्रकरणात देश सोडून फरार झाला आहे. रेवन्नाचा शोध घेण्यासाठी विशेष तपास पथक प्रज्वल एचडी देवेगौडा यांच्या बंगळुरू येथील घरी पोहोचले होते. यानंतर एचडी रेवन्ना यांना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने दोन्ही आरोपी नेत्यांचा जामीन अर्ज फेटाळला आहे. प्रज्वल यांनी अटकपूर्व जामिनासाठी आणि एचडी रेवन्ना यांनी अंतरिम जामिनासाठी याचिका दाखल केली होती.

## सिंचन घोटाळाप्रकरणी तटकरे अडचणीत
# मतदानाच्या दिवशीच सुनावणी

### सामाजिक कार्यकर्ते बबलू सय्यद यांची उच्च न्यायालयात धाव

**। अलिबाग । प्रतिनिधी ।** सिंचन घोटाळ्याप्रकरणी एफआयआरमध्ये नाव दाखल असतानादेखील सुनील तटकरे यांचे नाव का वगळण्यात आले? याबाबत सामाजिक कार्यकर्ते बबलू सय्यद यांनी माहितीच्या अधिकारात माहिती मिळविली. त्यानुसार त्यांनी सुनील तटकरेंसह १५ जणांविरोधात मुंबई उच्च न्यायालयात फौजदारी रिट पिटीशन दाखल केली असून, येत्या ७ मे रोजी त्यावर न्यायालयात सुनावणी होणार आहे. त्यामुळे महायुतीचे उमेदवार ऐन निवडणुकीत अडचणीत सापडले आहेत.

सिंचन घोटाळाप्रकरणी तटकरे अडचणीत

सिंचन घोटाळ्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. त्यांची कसून चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात आली. मात्र, सत्ताधाऱ्यांच्या आशीर्वादाने त्यांचे नाव चार्जशिटमधून वगळण्यात आले, असा आरोप करण्यात येत आहे.

याबाबत रोहा येथील सामाजिक कार्यकर्ते बबलू सय्यद यांनी सिंचन घोटाळ्याप्रकरणी माहितीच्या अधिकारात माहिती मिळविली. त्यामुळे सत्य समोर आले. पान ५ वर



> सिंचन घोटाळ्याचे प्रकरण दाबण्यासाठी सुनील तटकरे भाजपाच्या मांडीवर बसले. भाजपच्या वॉशिंग मशीनमध्ये गेल्यानंतर तटकरेंचे नाव सिंचन घोटाळ्यातून वगळण्यात आले. मात्र, येत्या ७ मे रोजी होणाऱ्या सुनावणीत उच्च न्यायालयाने चौकशीचे आदेश दिल्यास तटकरेंच्या भ्रष्टाचाराचा चेहरा जनतेसमोर उघडा पडेल.
>
> – ॲड. मानसी म्हात्रे, अलिबाग

> सिंचन घोटाळ्यात सुनील तटकरे यांचे नाव असतानादेखील त्यांचे चार्जशिटमधून नाव वगळले. तटकरेंविरोधात संबंधित विषयाबाबत मुंबई उच्च न्यायालयात फौजदारी रिट पिटीशन दाखल केली आहे. मतदानाच्या दिवशीच, म्हणजे ७ मे रोजी यावर सुनावणी होणार आहे.
>
> – बबलू सय्यद, सामाजिक कार्यकर्ता

### 'तटकरेंना मतदान करू नका'

काँग्रेस व राष्ट्रवादीची युती असताना सुनील तटकरे यांनी युतीचा भंग करून रवि पाटील यांना निवडणुकीत पाडले. त्यांचा मुलगा माजी आ. अनिकेत तटकरे यांना निवडून दिले. दरम्यान, माजी पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी दत्तक घेतलेली ग्रामपंचायत स्वतःच्या पक्षाच्या ताब्यात घेतली. या निवडणुकीत भाजपाचे कार्यकर्ते तटकरेंना मदत करीत आहेत. लोकसभेनंतर विधानसभेत युती होणार पान ५ वर

# तटकरेंनी खर्चाचा हिशोब दिला नाही

## सरकारी यंत्रणेने बजावली नोटीस

### खर्च सादर करणे बंधनकारक

लोकसभेसाठी उमेदवाराला ९५ लाख रुपये खर्च करण्याची मुभा निवडणूक आयोगाने दिली आहे. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर उमेदवाराच्या खर्चाचा लेखाजोखा स्वतः त्यांनी आपल्या नोंदवहीत ठेवतानाच जिल्हा पातळीवरील सरकारी यंत्रणेलाही सादर करणे बंधणकारक आहे. सरकारी यंत्रणादेखील उमेदवारांच्या प्रचारावर होणाऱ्या खर्चावर लक्ष ठेवून असते.

**। रायगड । खास प्रतिनिधी ।** देशभरात सर्वत्रच निवडणुकीच्या प्रचाराची धामधूम सुरु आहे. मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवार विविध माध्यमांचा वापर करीत आहेत. आपल्यालाच निवडून द्यावे यासाठी काही उमेदवार मोठ्या संख्येने पैसा खर्च करत आहेत. निवडणूक आयोगाने खर्चावर नियंत्रण राहावे यासाठी प्रत्येक उमेदवारांना खर्चाची मर्यादा दिली आहे. केलेला खर्चाचा हिशोब हा जिल्हास्तरावरील यंत्रणेला सादर करावा लागतो. रायगड लोकसभा मतदारसंघामध्ये एकूण १३ उमेदवारांपैकी महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांनी आपल्या खर्चाचा तपशील सादर न केल्याने त्यांना सरकारी यंत्रणेने नोटीस बजावली आहे.

गेल्या १५ दिवसांपासून प्रचाराचा धुरळा उडत आहे. शहरी आणि ग्रामीण भागामध्ये प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. सर्वच राजकीय पक्षाचे दिग्गज आपापल्या उमेदवारासाठी प्रचाराच्या मैदानात उतरले आहेत. रायगड लोकसभेत इंडिया आघाडीचे शिवसेनेचे उमेदवार अनंत गीते आणि महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) सुनील तटकरे यांच्यामध्येच खरी लढत होणार आहे. त्याचप्रमाणे अन्य ११ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. तेदेखील आपल्या पद्धतीने प्रचार करुन मतदारांपर्यंत पोहोचत आहेत.

शनिवारी खर्च सादर करणे आवश्यक होते. त्यानुसार शिवसेनेचे अनंत गीते यांनी ३० लाख ६४ हजार ९३४ रुपयांच्या खर्चाचा हिशोब दिला आहे. वंचितच्या कुमुदिनी चव्हाण यांनी आठ लाख ५५ हजार ६२५ रुपये, भारतीय जवान किसान पार्टीचे कर्नल प्रकाशराव चव्हाण यांनी ४६ हजार ३७९ रुपये खर्च केला आहे. तसेच अन्य नऊ अपक्ष उमेदवारांनीदेखील खर्च सादर केला आहे. मात्र, सुनील तटकरे यांनी खर्च सादर केलेला नाही. खर्चाचा ताळमेळ बसवताना त्यांच्या प्रतिनिधींची चांगलीच दमछाक होत असावी, अशी चर्चा जिल्हाधिकारी कार्यालयात होत होती. नियमानुसार नोटीस बजावून तटकरे यांना आता ६ मे रोजी खर्च सादर करावा, असे आदेश संबंधित यंत्रणेने दिले आहेत.

## तीन जवान शहीद

**नवी दिल्ली** : जम्मू-काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात शनिवारी दहशतवाद्यांनी भारतीय वायुसेनेच्या वाहनांवर गोळीबार करण्यात आला. या दहशतवादी हल्ल्यात तीन जवान शहीद झाले आहेत. लोकसभा निवडणुकांचे वारे वाहात असताना दहशतवाद्यांनी भ्याड कृत्य केलं आहे. प्राथमिक माहितीनुसार, या हल्ल्यात तीन जवान शहीद आणि चार जवान जखमी झाले आहेत. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# पिक्चर अभी बाकी है...

## आ. जयंत पाटील यांचा तटकरेंना सज्जड इशारा

**। अलिबाग/रोहा । प्रतिनिधी ।** सुनील तटकरे यांना मोठे करण्याचे काम त्यांचे बंधू अनिल तटकरे यांनी केले आहे. त्यांच्यासोबतदेखील तटकरे यांनी विश्वासघात केला. गद्दारी करणाऱ्या या भुताला बाटलीत भरायचे काम करायचे आहे, असे गीते सांगतात. मात्र, हा त्यातूनही बाहेर पडेल. त्यामुळे सुनील तटकरे यांना गाडण्याचे काम करायचे आहे. शेतकरी कामगार पक्ष संपविणार असे बोलणाऱ्यांनो पिक्चर अभी बाकी है, असा सज्जड इशारा आ. जयंत पाटील यांनी दिला.



रोहा येथे इंडिया आघाडीच्या वतीने शुक्रवारी जाहीर सभा आयोजित पान ५ वर

### इलाका तुम्हारा, धमाका हमारा : अंधारे

मोदींची गॅरंटी काय सांगता, आता तुमची गॅरंटी आहे का? उद्या जास्त खोके दिले तर भाजपात जाल, हीच आहे तुमची गॅरंटी. बॅ. ए.आर. अंतुले, आ. जयंत पाटील, आता शरद पवार यांच्याशी गद्दारी केलीत. कित्येक पिढ्यांची प्रॉपर्टी केलीत. आता इलाका तुम्हारा, धमाका हमारा रहेगा, असा जोरदार घणाघात शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी सुनील तटकरे यांच्यावर केला. शरद पवार यांनी तुम्हाला सर्व अधिकार, मंत्रीपद दिले, त्यांच्याशी गद्दारी केली. सर्वांना दगा देणाऱ्या तटकरेंची गॅरंटी काय, भविष्यात पैशांसाठी भाजपमध्ये प्रवेश करतील, असा सवालही अंधारे यांनी उपस्थित केला. 'वन नेशन, वन इलेक्शन'ची भूमिका भाजपची आहे. हे रोखणे गरजेचे आहे. कारण, भविष्यात स्थानिक स्वराज्य संस्थांसह सर्व निवडणुका बंद होतील, अशी भीतीदेखील अंधारे यांनी व्यक्त केली.

### सलमान खान गोळीबार प्रकरणाला
## धक्कादायक वळण

**मुंबई** : बॉलिवूड सुपरस्टार सलमान खानच्या घराबाहेर झालेल्या गोळीबार प्रकरणाशी संबंधित संबंधित अनुज थापन या आरोपीने काही दिवसांपूर्वी तुरुंगात आत्महत्या केल्याचा आरोप आहे. दरम्यान, अनुज थापन कथित आत्महत्या प्रकरण प्राथमिक शवविच्छेदन अहवाल समोर आला आहे. यामध्ये गळ्याभोवती आवळल्याची चिन्ह दिसत आहेत. ज्यामुळे श्वास गुदमरला गेला असावा. तर मेंदू न्यूरोपॅथॉलॉजीसाठी पान ५ वर






# आज इंडिया आघाडीचा 'ठाकरी बाणा'

- **अनंत गीतेंच्या प्रचारासाठी उद्धव ठाकरे मैदानात**
- **अखेरच्या टप्प्यात प्रमुख नेत्यांच्या तोफा धडधडणार**

**। रायगड । खास प्रतिनिधी ।** लोकसभा निवडणुकीतील प्रचाराच्या तोफा रविवारी थंडावणार आहेत. इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारासाठी अखेरच्या टप्प्यात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे अलिबागमध्ये येणार आहेत. महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांच्या विरोधात ठाकरे काय बोलणार याकडेच सर्व मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.

गेल्या १५ दिवसांपासून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या आहेत. हाय होल्टेज प्रचारामुळे मतदारसंघातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. इंडिया आघाडीच्या प्रचारसभा, प्रचार रॅली, कॉर्नरसभांना मतदारांनी तुफान प्रतिसाद पान ५ वर



● अलिबागेतील आघाडीच्या सभेसाठी उभारण्यात आलेला सभामंडप.

## कर्जतचा तरुण बनला कर्नल

### मुंबई मोनोरेलमध्ये संजूची नियुक्ती

**। नेरळ । प्रतिनिधी ।** कर्जत तालुक्यातील चांधई गावातील तरुण संजू सुदाम कोळंबे यांनी जिद्दीने मुंबई मोनोरेलमध्ये इच्छा पदावर नोकरी मिळविली आहे.

चांधई येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षण घेतलेला संजू कोळंबे या तरुणाने आईवडिलांची मेहनत सफल करून दाखवली आहे. आई अंगणवाडी सेविका आणि वडील भाजीपाला विकण्याचा व्यवसाय करतात. अशा तुटपुंज्या आर्थिक कमाईवर मोठ्या पदावर नोकरी मिळवायची अशी जिद्दी संजू कोळंबे याने कायम ठेवली होती. प्राथमिक शिक्षण घेऊन कडाव पान ५ वर



# कांदा निर्यातबंदी उठवली

## निवडणुकीवर डोळा ठेवून निर्णय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।** तब्बल चार महिने २७ दिवसानंतर केंद्र सरकारनं कांद्यावरील निर्यातबंदी हटवली आहे. मात्र, असं असली तरी दुसऱ्या बाजूला ४० टक्के किमान ५५० डॉलर प्रति मेट्रिक टन शुल्क निश्चित करण्यात आलं आहे. या निर्णयामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होईल की नाही, याबाबत संभ्रम होण्याची शक्यता आहे. कारण, एकीकडे निर्यातबंदी उठवली असली, तरी निर्यातीवर शुल्क लागू केले आहे. या निर्णयाचं निर्यातदारांनी स्वागत केलं असलं तरी विरोधकांनी मात्र या निर्णयाचा फायदा होणार नाही, असे म्हटले आहे.

लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कांदा उत्पादकांमधील रोष कमी करण्यासाठी केंद्र सरकारने कांद्याची निर्यातबंदी उठवण्याची घोषणा केली आहे. मात्र, प्रत्यक्षात अटी शर्ती लागू करत कांद्याची निर्यात होणार नाही, अशाप्रकारे डावपेच आखण्यात आले आहेत. त्यामुळे ही निर्यातबंदी उठवल्याचा काहीही फायदा होणार नाही, असे किसान सभेने म्हटले आहे.

कांद्याच्या निर्यातीसाठी प्रति टन ५५० डॉलर किमान निर्यात मूल्य व ४० टक्के निर्यात शुल्क लागू करण्यात आले आहे. यामुळे भारतीय कांदा निर्यात करताना त्याचे शुल्क पान ५ वर

> आत्ता निर्यातबंदी उठवणं म्हणजे बैल गेला अन् झोपा केला अशी गत झाली आहे. निर्यातबंदी उठवण्यासाठी तीन महिने का लागले?
>
> – बाळासाहेब थोरात, काँग्रेस नेते





## वे|ध|क

### स्ट्राँग रूमची पाहणी

**रायगड :** जिल्ह्यातील रायगड लोकसभा मतदारसंघासाठी दि.७ मे रोजी मतदान होणार असून मतदान झाल्यानंतर सर्व ईव्हीएम मशीन ठेवण्यात येणाऱ्या स्ट्राँग रूमची व मतमोजणी केंद्राची पाहणी मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी केली. जिल्हा निवडणुक विभागाने केलेल्या पूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी चोक्कलिंगम रायगड लोकसभा मतदारसंघाच्या दौऱ्यावर आहेत. मतदान प्रक्रिया, कायदा व सुव्यवस्था, मनुष्यबळ आदीबाबत माहिती घेऊन निवडणुका शांततेत पार पाडण्यासाठी सुरक्षेच्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत त्याचा आढावा घेतला आहे. रायगड लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी दि.४ जून रोजी होणार असून अलिबाग येथील नेहुली येथे उभारण्यात आलेल्या मतमोजणी केंद्राची पाहणी केली. यावेळी त्यांच्या समवेत जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भारत बास्टेवाड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे, उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड आदी उपस्थित होते.

### लोकशाही बळकटीची जबाबदारी तरुणाईवर

**रायगड :** रायगड लोकसभा मतदारसंघात ७ मे रोजी होत असलेल्या मतदानामध्ये सर्वात जास्त मतदान करून रायगड जिल्ह्याला मतदानात अग्रेसर होण्याचा निर्धार युवक-युवतींनी करावा. यामध्ये सर्वात महत्वाची भूमिका तरुणाईची आहे, तरुणाईने ठरविले तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही. त्यामुळे येत्या ७ मे रोजी सर्व पात्र मतदारांसह प्रत्येक युवक-युवतीने मतदान करावे. तसेच आपल्या कुटुंबातील सर्व सदस्य, मित्र-मैत्रिणी यांना मतदानासाठी आग्रह धरून त्यांचे मतदान होईल, यासाठी पाठपुरावा करावा. असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

# जिल्ह्यातील मतदारसंघात मतदानाचे प्रमाण वाढावे

## मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांचे निर्देश




**। रायगड । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यातील मतदारसंघात मतदानाचे प्रमाण वाढावे यासाठी निवडणूक यंत्रणातील सर्वांनी सर्वंकष प्रयत्न करावेत. मतदारांना सुलभपणे तसेच शांततापूर्ण वातावरणात मतदान करता यावे यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावे. त्यादृष्टीने मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा उपलब्ध करुन त्याची माहिती मतदारांना द्यावी, निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्यादृष्टीने सर्व घटकांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित निवडणूक विषयक आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजीत बढे, निवासी उजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे यांसह विविध समित्यांचे नोडल अधिकारी उपस्थित होते.

यावेळी चोक्कलिंगम म्हणाले, मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी दिव्यांग मतदार, ८५ वर्ष वयावरील ज्येष्ठ नागरिक यांना आयोगाने घरून मतदान करण्याची सुविधा दिली आहे. याची अंमलबजावणी काळजीपूर्वक व्हावी. इपिक कार्ड घरोघरी जाऊन वाटप करावेत. दिव्यांग मतदारांना सुलभपणे मतदान करता यावे यासाठी ब्रेल वोटर स्लिप दिव्यांग मतदारांपर्यंत पोहोचतील याची दक्षता घेतली जावी. मतदानाच्या दिवशी मतदारांना सर्व आरोग्य विषयक सुविधा मिळणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने यंत्रणा सज्ज ठेवा, सर्व अहवाल विहित नमुन्यात आणि विहित वेळेत पाठवावे. मतदानावर परिणाम करणाऱ्या गैरसमज पसरविणारे संदेश व घटनांचे खंडन करण्यात यावे, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी जावळे यांनी सादरीकरणाद्वारे जिल्ह्यातील निवडणूक तयारीची माहिती दिली. यामध्ये मतदान केंद्रावर देण्यात येणाऱ्या सुविधा, मतदान जनजागृतीसाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम, आचार संहिता कक्ष तसेच इतर कक्ष करत असलेले कार्य, दिव्यांग मतदारांसाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना, सर्व तयारी पूर्ण झाली असल्याचे यांनी सांगितले.

# निवडणूक प्रक्रियेमध्ये माध्यमांची भूमिका महत्त्वपूर्ण

## एस.चोक्कलिंगम यांचे प्रतिपादन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

निवडणूक प्रक्रियेमध्ये माध्यमांची भूमिका महत्त्वपूर्ण असून विविध माध्यमाने समन्वय राखताना माध्यम कक्षाने सतर्कतेने भूमिका पूर्ण करावी, असे प्रतिपादन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी केले. जिल्हा माहिती कार्यालयात लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने स्थापन माध्यम संनियंत्रण व जनसंपर्क कक्षाला भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली. यावेळी माध्यम कक्षाच्या कामकाजाबाबत राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोकलिंगम यांनी समाधान व्यक्त केले.


यावेळी मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम यांनी विविध माध्यमांमधील जाहिराती आणि पेड न्यूजबाबत कक्षातर्फे करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती घेतली. तसेच, जिल्हा माहिती अधिकारी



मनीषा पिंगळे यांनी माध्यम कक्षाच्या कामकाजाविषयी माहित दिली. माध्यम कक्षात सुमारे ८ दूरचित्रवाणी संचांच्या माध्यमातून वृत्तवाहिन्यांतील निवडणूक प्रचार, जाहिरात, पेड न्यूज आदींच्या अनुषंगाने संनियंत्रण केले जात आहे. तसेच, सोशल मीडियावरील पोस्टबाबतही बारकाईने संनियंत्रण केले जात आहे. वृत्तपत्रातील जाहिराती आणि पेड न्यूजबाबतही दररोजच्या वृत्तपत्रांचे अवलोकन केले जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यानंतर राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोकलिंगम यांनी सीव्हिजील कक्षालाही भेट देऊन नागरिकांच्या तक्रारी संदर्भात करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती घेतली. त्यांच्या समवेत जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे आदी उपस्थित होते.

# कोलाड पोलीसांचे संचलन



**। खांब । वार्ताहर ।**

संपुर्ण देशभर सध्या लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी चालू आहे. सर्वत्र शांतता व सलोख्याचे वातावरण निर्माण व्हावे या दृष्टीने पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून त्याच पार्श्वभूमीवर आंबेवाडी-कोलाड - वरसगाव नाक्यावर कोलाड पोलीसांनी रूटमार्च करून रहिवासी वर्गामध्ये एक विश्वासाचे नाते निर्माण केले आहे.

कोलाड पोलीस स्टेशनचे ए.पी. आय चौधरी, पी.एस.आय.चौधरी, पी.एस.आय. मुंडसे व पी.एस.आय. पाटील यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली व मार्गदर्शनासाठी संचलन करण्यात आले. यात कोलाड पोलीस स्टेशनचे दोन अधिकारी, दहा पोलीस अमंलदार व त्रिपुरा स्टेट फोर्सचे ३३ जवान सहभागी झाले होते.

लोकसभा निवडणूक शांततेत पार पडून कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी महाराष्ट्र पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून रहिवासी वर्गामध्येही एक विश्वासाचे नाते निर्माण व्हावे, यासाठी कोलाड पोलीस यंत्रणेकडून अंबर सावंत मंदिर, हॉटेल विजय पॅलेस, तटकरे पार्क, हॉटेल मराठा पॅलेस आदी ठिकाणी संचनल करण्यात आले.

# उरणमध्ये वाघेरेंच्या प्रचाराला उस्फूर्त प्रतिसाद

**। उरण । वार्ताहर ।**

मावळ लोकसभा महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचाराला उरण तालुका व शहरांमध्ये प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. नुकतेच त्यांच्या प्रचारार्थ उरण शहरांमध्ये माजी आ. मनोहर भोईर यांच्या नेतृत्वाखाली भव्य प्रचार रॅली काढण्यात आली. यामध्ये शिवसेना (उध्दव ठाकरे), काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार), शेतकरी कामगार पक्ष, कम्युनिस्ट पार्टी, आप, रिपब्लिकन गट व मित्र पक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठा सहभाग घेतला. या प्रचार रॅलीला उरणकरांनी अतिशय चांगला असा प्रतिसाद दिला.



या रॅलीला काँग्रेसचे मिलिंद पाडगावकर, नरेश रहाळकर, संतोष ठाकूर, तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, कम्युनिस्ट पार्टीचे कॉम्रेड भूषण पाटील, सुमनताई पाटील, शेकापचे काका पाटील, रमाकांत म्हात्रे, तालुका संपर्कप्रमुख दीपक भोईर, मार्तंड नाखवा, महिला आघाडीच्या उपजिल्हा संघटिका ममता पाटील, शेकाप तालुका अध्यक्ष सीमा घरत, वंदना पवार, नगरसेवक अतुल ठाकूर, निलेश भोईर, अफशा मुकरी, अन्वर कुरेशी, शादाब शेख, विनोद म्हात्रे, अखलाज सिलोत्री, लॉटरी शेखर पाटील, नायदा ठाकूर, हुसेना शेख, मुमताज भाटकर, रुबीना कुट्टी, हसीमा सरदार, प्रवीण मुकादम, गणेश पाटील, चेतन म्हात्रे, गुलजार भाटकर, मविआचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# इंडिया आघाडीच्या गाव बैठकांचा धडाका

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

रायगड लोकसभा मतदारसंघाचे इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना निवडून आणण्यासाठी सुधागड तालुक्यातील इंडिया आघाडीच्या कार्यकर्त्यांनी कंबर कसली आहे.

सुधागड तालुक्यातील नांदगाव पंचक्रोशीतील कोशिबळे, नागशेत, नेनवली, पिपलोली, खडसाबळे, आतोने, कलबोशी, गोमाशी, फणसवाडी, वावलोली, सिद्धेश्वर येथे शेकाप, शिवसेना, राष्ट्रवादी कॉग्रेस, आय कॉग्रेस या इंडिया आघाडीतील घटक पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते गाव, वाडी वस्त्यांवर गावोगावी प्रत्येक घरोघरी जाऊन प्रचार सभा घेऊन जोरदार प्रचार करत आहेत.

अनंत गीते यांच्यावर कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचाराचा आरोप नाही, स्वच्छ प्रतिमेच्या उमेदवाराला बहुसंख्य मतांनी निवडून विजयी करा, असे कार्यकर्ते मतदारांना आवाहन करत आहेत.

# निवडणूक निरीक्षकांची जिल्हाधिकारी कार्यालयाला भेट

**। रायगड । प्रतिनिधी ।**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत मावळ मतदारसंघासाठी नियुक्त निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) बुदिती राजशेखर यांनी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी किशन जावळे यांची भेट घेतली. त्यांच्यासमवेत मावळ लोकसभा मतदारसंघात जिल्हा प्रशासनाच्यावतीने सुरु असलेल्या पूर्वतयारी बाबत चर्चा केली. तसेच, त्यांनी निवडणूक कामकाजाचा आढावा घेतला.

मावळ लोकसभा मतदारसंघात उरण, पनवेल, कर्जत विधानसभा क्षेत्रातील भाग असून मतदारसंघाशी संबंधित कामकाज सुरू आहे. निवडणूक निरीक्षक बुदिती राजशेखर यांनी जिल्हा निवडणूक आचारसंहिता कक्ष, निवडणूक सनियंत्रण कक्ष, मीडिया सेल आदींची पाहणी केली. त्यांनी लोकसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. तसेच, माध्यम कक्षातील इलेक्ट्रॉनिक मीडिया सेल, समाज माध्यमद्वारे प्रसिद्धी, इलेक्ट्रॉनिक मीडिया, जिल्हा माध्यम कक्षातून प्रसार माध्यमे व वृत्तपत्र प्रतिनिधी यांच्याशी समन्वय राखला जात आहे. यावेळी राजशेखर यांनी जिल्हा माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीच्या कामकाजाबद्दल माहिती घेतली. निवडणुकीची मतदान जागृतीसाठी स्विपसह विविध उपक्रमांच्या प्रसिद्धीची माहिती माध्यम कक्ष प्रमुख मनीषा पिंगळे यांनी यावेळी दिली.

याप्रसंगी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, उपविभागीय अधिकारी संदीपान सानप, जिल्हा माहिती अधिकारी मनीषा पिंगळे आदी उपस्थित होते.

# शिहू येथे इंडिया आघाडीच्या प्रचाराला वेग



**। शिहू । वार्ताहर ।**

रायगड लोकसभा निवडणूक प्रचार अंतिम टप्प्यात आला असून ठिकठिकाणी प्रचाराला वेग आल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. तिसऱ्या टप्प्यातील लोकसभा मतदान ७ मे रोजी होत असून इंडिया आघाडीचे कार्यकर्ते आपापल्या परीने प्रचार करताना दिसत आहेत. इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार अनंत गीते यांना निवडून आणण्यासाठी शिहू विभागातील झोतिरपाडा, बेणसे, टाऊनशिप येथे शनिवारी (दि.४) कामगार नेते साधुराम मालुसरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना उपजिल्हा संघटिका दर्शना जवके व शिहू विभाग प्रमुख दिपक पाटील यांच्या नेतृत्वाखाली मतदारांच्या घरोघरी जाऊन प्रचार करण्यात आला.

'कहो दिलसे अनंत गीते फिरसे' असा नारा देत अनंत गीते यांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे मतदारांना आवाहन करण्यात आले. या प्रचार फेरीत शिहू विभाग सहसंपर्क प्रमुख अशोक भोय, शिहू विभाग संघटिका वर्षा कोळी, टाऊनशिप शाखाप्रमुख अरुण कारंडे, झोतिरपाडा शाखाप्रमुख मोहन पाटील, शेकाप, काँग्रेस कार्यकर्ते निलेश म्हात्रे, सदाम मोमीन, विश्वनाथ उतेकर, रोहिणी अल्हाट, सोनम पाटील, संजय भोय, नितीन देशमुख, सुहास कुथे यांसह इंडिया आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाका कामगारांचे अच्छे दिन; प्रचारासाठी वाढती मागणी

**। पनवेल । वार्ताहर ।**

मावळ लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचा जोर वाढला असून प्रचार रॅली तसेच कार्यकर्त्यांसह नागरिकांची गर्दी जमविण्यासाठी पक्ष पदाधिकाऱ्यांची धावपळ सुरू झाली आहे. प्रचार पत्रके वाटण्यासाठी तसेच रॅलीत सहभागी होण्यासाठी कार्यकर्त्यांची जमवाजमव करण्यात येत आहे. यामध्ये नाका कामगारांना अच्छे दिन आले आहेत. प्रचारासाठी त्यांची रोजंदारीवर नियुक्ती करण्यात आली आहे, तर काही कार्यकर्त्यांना विशिष्ट रक्कम देऊन प्रचारात गुंतवण्यात आले आहे.

आगामी निवडणुकीत अनेक कार्यकर्त्यांना पक्षाकडून काही रुपये भत्ता अन् दोन वेळचे जेवण दिले जात आहे. तर, बहुतेक पक्षांकडून नाका कामगारांनादेखिल निवडणुकीच्या प्रचारासाठी पसंती देण्यात येत आहे. पनवेल व कळंबोलीमध्ये वय व नीटनेटकेपणा पाहून ठराविक नाका कामगारांना हजेरीवर घेतले जात आहे. सध्या या कामगारांचा भाव वाढला असून विविध पक्षांकडून मागणी असल्याने सकाळी एका पक्षासोबत आणि सायंकाळी दुसऱ्या पक्षाचा प्रचार करण्यात ते व्यस्त दिसत आहेत.

प्रचारात दोन पैसे अधिक मिळत असल्याने नाका कामगार, बांधकाम क्षेत्रातील मजूर मोठ्या संख्येने प्रचारात गुंतले आहेत. उमेदवारांच्या प्रचारासाठी शहर व ग्रामीण परिसरात नेत्याच्या जवळच्या पदाधिकाऱ्यांकडून अनेक नाका कामगारांची जमवाजमव करण्यात आली आहे. झोपडपट्टी परिसरातील काही ठराविक महिला व पुरुषांना यासाठी बोलावले जात आहे. ग्रुप प्रमुखास निरोप मिळाल्यानंतर बाकीचे कामगार रॅलीसाठी तयार होतात. नियोजित स्थळी प्रचाराची टोपी, शेला, पत्रके अन् बॅनर घेऊन ते हजेरी लावतात. तसेच, गर्दी जमविण्यासाठी काही पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

# १२ ओळखीचे पुरावे ग्राह्य

**रायगडः** मतदान करण्यासाठी निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १२ओळखीचे पुरावे म्हणून ग्राह्य धरले आहेत. त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर संबंधितांना मतदान करता येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे. यात पारपत्र, वाहन चालक परवाना, केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लि. कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले ओळखपत्र, बँक/टपाल पासबुक, पॅनकार्ड, भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, रोजगार ओळखपत्र, निवृत्तीवेतनाची दस्तावेज, संसद/विधानसभा/विधानपरिषदेचे अधिकृत ओळखपत्र, आधार कार्ड, भारत सरकारने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र, मंत्रालय आरोग्य विमा स्मार्ट कार्ड हे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत.

# संजोग वाघेरेंना मराठा समाजाचा पाठिंबा

**। रसायनी । वार्ताहर ।**

महायुती सरकारने मराठा समाजाला आरक्षण देण्याचे अश्वासन दिले पण, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धोका दिला आहे. मराठा समाजाच्या मनात खदखद आहे, तो रोष काढण्यासाठी भाजप आणि शिंदे गटाचे उमेदवार पाडण्यात मोठा विजय असल्याचा निर्धार सकल मराठा समाजाने करीत मावळ मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना जाहिर पाठिंबा खोपोलीतील बैठकीत देण्यात आला आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांना पाठिंबा देण्यासाठी शनिवारी



(दि.४) सकल मराठा समाज समन्वयकांची बैठक झाली. मराठा समाजाच्या आंदोलनाकडे विद्यमान खासदारंनी पाठ फिरवल्याने बारणे यांना मतदान न करण्याचे सर्वांनी बोलून दाखविले. त्यामुळे बारणे यांच्या विरोधातील तगडा उमेदवार संजोग वाघेरेंना एकदा संधी देण्याचे एकमताने ठराव करण्यात आला.

यावेळी सर्व समाज बांधवांना सोबत घेऊन काम करण्याची भुमिका राजकारण व समाजकारण करताना नेहमीच घेतली आहे. मात्र, मराठा समाजाचा प्रतिनिधी म्हणून समाजासाठी भुमिका घेण्यासाठी मी बांधील आहे. मराठा आरक्षणाबाबत संसदेत भक्कमपणे बाजू मांडण्याचे काम करू. तसेच, मराठा समाजासोबत सर्वच समाज घटकांना न्याय देवू, असा विश्वास शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी मराठा समाजाला दिला.

या बैठकीला महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे, सकल मराठा समाज महाराष्ट्र राज्य समन्वय डॉ.सुनिल पाटील, विनोद साबळे, रायगड जिल्हा समन्वयक शंकर थोरवे, गणेश कडु, उमेश म्हसे, प्रकाश पालकर, अनिल भोसले, मारूती पाटील, धनश्री दिवाने, किरण हाडप, उत्तम भोईर, जे.पी.पाटील, भानुदास पालकर, सुरेश बोराडे, नितीन मोरे, अविनाश तावडे, दीपक लाड, एकनाथ पिंगळे, राजन सुर्वे, अविनाश तावडे, मनोहर देशमुख यांच्यासह सकल मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवडणुकीसाठी तळा प्रशासन सज्ज

**। तळा । वार्ताहर ।**

देशाच्या आगामी लोकसभा निवडणुकीसाठी तळा प्रशासन सज्ज झाले असून तालुक्यातील ५५ ठिकाणी मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत. या मतदान केंद्रावरील मतदान मशिनसह इतर साहित्य अधिकारी वर्गाच्या उपस्थितीत सील करण्यात आले आहेत. लोकसभा निवडणुकीसाठी रायगड मतदार संघातून विविध पक्षाचे व अपक्ष मिळून १३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे ठाकले आहेत. ज्यामध्ये इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते व महायुतीचे उमेदवार तटकरे या दोघांमध्ये मुख्य लढत होणार आहे. तालुक्यात लोकसभेसाठी मतदान करणाऱ्या नागरिकांची संख्या ३७,४३४ एवढी असून यामध्ये



तालुक्यात ५५ मतदान केंद्रावर मतदान

पुरुष मतदार संख्या १८,६०३, तर स्त्री मतदार संख्या १८,८३१ एवढी आहे.

प्रशासनातर्फे दिव्यांगांनीदेखील आपल्या मतदानाचा हक्क बजावावा यासाठी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. ज्यामध्ये घरूनच मतदान करणे, मतदान केंद्रावर व्हीलचेअरची व्यवस्था, रॅम रेलिंग, जाण्या-येण्याची वाहन व्यवस्था, तसेच दिव्यांगांना स्वयंसेवक, मदतनीस इत्यादी सोय करण्यात आली आहे. तालुक्यातील एकही नागरिक मतदानापासून वंचित राहू नये यासाठी प्रशासनातर्फे युद्धपातळीवर तयारी करण्यात आली असून तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन देखील तळा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.





● रोहा येथील राम मंदीर चौकात शुक्रवारी (दि.४) झालेल्या सभेत इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ मार्गदर्शन करताना आ. जयंत पाटील, तसेच मशाल पेटवून मतदान करण्याचे आवाहन करताना शिवसेना (ठाकरे गट) उपनेत्या सुषमा अंधारे आदी मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.



● आगरसुरे येथे शुक्रवारी (दि.३) इंडिया आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी आ. जयंत पाटील, आ. संजय पोतनीस, शेकापचे जेष्ठ नेते शंकरराव म्हात्रे, नृपाल पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, शिल्पा घरत, काका ठाकूर, सुनील थळे आदी सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




● चौकीचापाडा येथे महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, माजी जि.प. सदस्या चित्रा पाटील व कार्यकर्ते मोठ्या संख्येने अपस्थित होते.



● खंडाळा ग्रामपंचायत हद्दीतील महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ सरपंच नाशिकेत कावजी, माजी सरपंच संतोष गुरव, सदस्य संजू पाटील, रूचिता भगत, शिवसेनेचे अवेश पाटील, प्रशांत म्हात्रे, किर्ती पाटील, कल्पेश पाटील व तुषार म्हात्रे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# निवडणुकीत वितरीत होणारा निधी थांबवा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

ज्यांनी मार्चच्या अगोदर कामे केली आहेत, त्यांना निधी देण्यास सरकार दिरंगाई करीत आहे. मात्र, नवीन रस्त्याच्या भुसंपादनासाठी निधी वितरीत करण्याच्या हालचाली निवडणूकीत झाल्या आहेत. पाचशे कोटीहून अधिक निधी वितरीत करण्यास पनवेलच्या उपविभागीय अधिकाऱ्यांकडून सुरु झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत संशय निर्माण होत आहे, असा आरोप माजी आ. पंडित पाटील यांनी केला आहे.



संपुर्ण महाराष्ट्रात देशामध्ये लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता आहे. या कालावधीत प्रशासन कोणताही निधी वितरीत करीत नाही. रायगड जिल्हयामध्ये मोठ्या प्रमाणात निधी आणला. मात्र, मार्च महिन्यात सरकारकडून अल्पसा निधी देण्यात आला. दीड महिने होत आले आहेत. याकालावधीत ठेकेदारांनी मोठ्या प्रमाणात कामे केली. परंतु, निधी नसल्याने विकास कामे ठप्प झाली आहेत. विकासाच्या नावाने वल्गना करणारे गायब झाले आहेत. मात्र, ज्या ठेकेदारांनी कामे केली आहेत, ते देशोधडीला लागले आहेत. अलिबाग-विरार रस्त्याच्या भूसंपादनाचे निवाडे झाले असले, तरी जिल्हाधिकारी यांनी पनवेल उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत आदर्श आचासंहितेच्या कालावधीत सुमारे पाचशे कोटी रुपयांचा निधी थेट शेतकऱ्यांना न देता संबंधित एजंट लोकांना देण्यात आल्याची धक्कादायक बातमी समोर येत आहे. ऐन निवडणूकीच्या तोंडावर इतका निधी वितरीत केल्यामुळे जनतेमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. हा आदर्श आचारसंहितेचा भंग होतो की नाही, असा सवाल निवडणूक आयोगाला विचारण्यात आला आहे.

रायगड जिल्हयामध्ये विद्यमान सरकारने अनेक योजनांतर्गत कामे ठेकेदारांकडून करून घेतली. मात्र, त्यांनी केलेल्या कामाचे पैसे देताना संबंधित अधिकारी आचारसंहितेचे कारण सांगून वेळकाढूपणा करीत असल्याचा आरोप पंडित पाटील यांनी केला आहे. ऐन निवडणूकीत कोणाच्या दबावाखाली रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी एवढा मोठा निधी भूसंपादन अधिकाऱ्यांमार्फत वितरीत करण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. निवडणूक झाल्यावर या निधीचे वितरण करण्यात यावे अन्यथा हा पैसा निवडणूकीत थेट वापरण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे पंडित पाटील म्हणाले.



● पोलादपूर तालुक्यातील संवाद धारवली विभागात शेतकरी कामगार पक्ष व इंडिया आघाडीच्या वतीने प्रचार रॅली काढण्यात आली. यावेळी महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचार रॅलीला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.






## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

५ मे

१) श्रीम. पार्वती गोकुळ कोळी मु.नवेदर, अलिबाग, ५-५-१९५०

# कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**



**कै. वासुदेव मल्लिकार्जुन बेत, स्मरणार्थ अलिबाग**

**आजचे अन्नदाते**

**डॉ. सौ. रेखा म्हात्रे, वाढदिवस, कार्ले खिंड अलिबाग**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी दिलेल्या सुचनेवरून आम्ही मौजे कामथ, ता.अलिबाग, जि.रायगड येथील विद्यमान मालकांच्या नावे असलेल्या खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतींच्या मालकी हक्कांच्या निर्वेधतेची पडताळणी करीत आहोत. परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतींचे मालकांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतींमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत व त्या विकणेचा त्यांस पुर्ण हक्क अधिकार आहे.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतींमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट अे.डी. द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतींमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायम स्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व मिळकतींचे विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहेत असे गृहित धरून आमचे अशिल विक्री व्यवहार पुर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**

**मौजे कामथ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार रू. पैसे | मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ९ | ०-३२-८०<br>पो. ख. ०-०१-८०<br>०-३४-६० | ७.९४ | बाबुलाल भगवानदास खंडेलवाल |
| २९ | ०-००-५०<br>०-१२-२०<br>०-१२-७०<br>पो. ख. ०-०१-३०<br>०-१४-०० | ०.१८ | बाबुलाल भगवानदास खंडेलवाल,<br>विजय बाबुलाल खंडेलवाल,<br>विकास बाबुलाल खंडेलवाल,<br>अशोक बाबुलाल खंडेलवाल |
| ३० | ०-०४-६० | ०.०८ | बाबुलाल भगवानदास खंडेलवाल,<br>विजय बाबुलाल खंडेलवाल,<br>विकास बाबुलाल खंडेलवाल,<br>अशोक बाबुलाल खंडेलवाल |
| ५०१ | ०-२५-७०<br>०-०४-००<br>०-२९-७०<br>पो. ख.०-०३-६०<br>०-३३-३० | ५.९३ | बाबुलाल भगवानदास खंडेलवाल,<br>विजय बाबुलाल खंडेलवाल,<br>विकास बाबुलाल खंडेलवाल,<br>अशोक बाबुलाल खंडेलवाल |

अलिबाग
तारीख : ५/५/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

अर्जदारतर्फे ॲड. संजय आचार्य
अलिबाग येथील सिव्हिल जज्ज सिनिअर डिव्हिजन यांचे कोर्टात,
दिवाणी चौकशी अर्ज ६०/२०२३

श्रीमती निलिमा नरेंद्रकुमार दळवी वगैरे, — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

ज्याअर्थी नरेंद्रकुमार श्रीपत दळवी यांचे तारीख ०७/०१/२०१८ रोजी बॅटंगॅस, फिलिपाईन्स येथे मयत झाले असून, अलिबाग नगरपालिका परिषदेचे हद्दीतील अलिबाग शहरांतील ब्राह्मण आळी येथील मालमत्ता क्रमांक ALB००००१९६० Z1BHA००१९७५ मधील निवासी सदनिका क्रमांक २०२, क्षेत्रफळ ३३.५६ चौरस मीटर्स आणि स्टेट बँक ऑफ इंडीया, अलिबाग शाखा येथील बचत खाते क्रमांक ११२३६९४५१७१ मधील रक्कम कै. नरेंद्रकुमार श्रीपत दळवी यांचे मालकीचा आहे. सदर मिळकतीकरिता त्यांस अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत असे ठरवून मिळणेकरिता अर्जदारांनी अलिबाग कोर्टात वरील प्रमाणे अर्ज केला आहे. सबब तसा वारस दाखला देणेसंबधी कोणाच्या काही हरकती असल्यास त्यांनी लेखी स्वरुपांत तारीख १२/०६/२०२४ रोजी मे. कोर्टात दाखल कराव्यात अन्यथा अर्जदारास वारस दाखला दिला जाईल.

आज दिनांक २३/४/२०२४ रोजी माझ्या सहिनीशी व न्यायालयाचे सहिनीशी दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपिक**
**दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर)**
**अलिबाग**

(कोर्टाचा शिक्का)

सही/-
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर)**
**अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे- थळ ता. अलिबाग, जि. रायगड सर्व्हे नं. २१६/१, एकूण क्षेत्र ०-२१-७० हे.आर., आकार ३.४७ रू.पै.ही बागायत मिळकत, तसेच या मिळकतीतील गट ग्रामपंचायत थळ, १) मिळकत नं. ५२०, क्षेत्र १०६.६० चौ. मीटर २) मिळकत नं. ५२१/अ, क्षेत्र १४.३१ चौ. मीटर या घर मिळकतीसह, या मिळकतीचे विद्यमान मालक केतन मृणाल म्हात्रे रा. मु. पो. थळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०५/०५/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता- श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर,
ब्राह्मण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकती त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे पाथरज, तालुका कर्जत, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकती**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| हरिश्चंद्र काथोर सिसवे | ४५ | २ | ०-२८-९० | ३-०० |
| हरिश्चंद्र काथोर सिसवे | ४५ | ४ | ०-२८-६० | ३-०६ |

वर वर्णन केलेली शेतजमिन मिळकतींच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतींच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत कळवावी, वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील शेतजमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारस हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येउन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०४/०५/२०२४

अधिवक्ता
**संपत पांडुरंग हडप**
रा. गणेगाव चिंचवली ता. कर्जत, जि. रायगड
९०२८५५६४४७/९३७१८९९९५६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकती त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे खांडस, तालुका कर्जत, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकती**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| जनार्दन लडकू कुरंगले,<br>द्वारकानाथ राधाकृष्ण बानावलीकर<br>संजय वासुदेव कुलकर्णी<br>अरविंद वामन पंडित | ८० | ३ | १-४९-०० | १-०० |

वर वर्णन केलेली शेतजमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तीचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतींच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत कळवावी, वरील मूदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील शेतजमिन मिळकतींशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतींच्या खरेदीच्या व्यवहारस हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०४/०५/२०२४

अधिवक्ता
**संपत पांडुरंग हडप**
रा. गणेगाव चिंचवली ता. कर्जत, जि. रायगड
९०२८५५६४४७ /९३७१८९९९५६

## जाहिर नोटिस

तमाम लोकास कळविण्यात येते की, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी त्यांच्या खालील परिशिष्ठात वर्णन केलेल्या मिळकतीचे मालकी हक्कांबाबत खात्री दिली आहे व सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी असल्याबद्दलची तसेच त्यांना पणन योग्य हक्क (मार्केटेबल टायटल) असल्याबद्दलची खात्री दिली आहे. तरी सदर जमीन मिळकतीवर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क हितसंबंध उदा. गहाण, दान, पोटगी, चार्ज, लिज, कोर्ट डिकी, कोर्टात वादाचा विषय, भाडेकरू हक्क, कुळ, ताबा वहिवाट लायसन्स, वारसा हक्क, कर्ज, बोजा, करार, मदार, मुखत्त्यारपत्र, अक्षर अन्य कोणत्याही प्रकारे, हक्क, हितसंबंध व मालकी अधिकार असल्यास त्यांनी सदर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत कागदपत्रे व त्यांच्या सत्यप्रतीसह लेखी हरकत नोंदवुन आमची खात्री पटवुन दयावी. वरील कोणाचीही हरकत न आल्यास सदरील जमीन मिळकत पुर्णपणे निर्वेध निजोखमी व बोजारहित आहे व त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार नाही व तसा कोणाचही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार नाही व तसा कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक समजून उमजून सोडुन दिलेला आहे असे समजण्यात येईल व नंतर कोणाचीही हरकत/तक्रार चालणार नाही यांची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट :**

**गाव-बेलोंडाखार, तालुका-उरण, जिल्हा - रायगड.**

| क्र. | नाव | गट क्र. | क्षेत्रफळ हे.आर. | क्षेत्रफळ चौमी | आकार रू. | आकार पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. नरेश पुंडलिक गौरी वगैर २ तर्फे खरेदीखत धारक महादेव प्रभाकर झेंडे | २३/३ | ०० | १५.७० | ०१ | ९४ |

ठिकाण : उरण
दिनांक : ४/५/२०२४

**दिप्ती जगदीश पाटील**
वकील
पत्ता: रियल टेक पार्क, ऑफिस नं. ११०९/१०,
सेक्टर ३०ए, वाशी, नवीमुंबई.
मोबाईल ९०२८५६५२६०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे शहापुर, ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालक १)श्री.जयंत बाळाराम पाटील, २)श्री.देविदास बाळाराम पाटील, रा.घसवड, पो.शहाबाज, ता.अलिबाग जि.रायगड यांच्या पैकी श्री.जयंत बाळाराम पाटील यांच्या निम्या अविभक्त हिश्याच्या क्षेत्रापैकी ०-१६-०० हे.आर. क्षेत्राची मिळकत त्यांचेकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याबाबत ठरवले असून उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडून कुळकायदा कलम ४३ ची परवानगी देखील प्राप्त करून घेतली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे शहापुर, ता.अलिबाग जि.रायगड**

| सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर.) | पो.ख (हे.आर.) | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ५५६/३ | ०-४२-२० | ०-०७-६० | ५.६९ |

तरी वर नमूद जमिन मिळकतीवर मिळकतीचे विद्यमान मालकांशिवाय अन्य कोणाही इसमाचा-संस्थांचा दावा, अपील, अर्ज, महसुल दावे/अपील इत्यादी वगैरे अथवा अन्य कोणत्याही कोर्ट केसेस दाखल असल्यास तसेच साठेकरार, खरेदीखत, कुळवहिवाट, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, वारसाहक्क, पोटगी, दान, गहाण, तारण, बोजा, भाडेपट्टा, अदलाबदलीचा करारनामा, जाणे-येणेचा वहिवाटीचा मार्ग अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. उक्त मुदतीत कोणत्याही हरकती न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असून तिचे टायटल क्लिअर व मार्केटेबल आहे असे समजून आमचे अशिल मिळकतीचे विद्यमान मालकांबरोबर सदर मिळकतीच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच वर नमुद केल्याप्रमाणे कोणाचा कोणताही हक्क असल्यास, तो त्यांनी जाणीवपुर्वक आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला आहे असे समजण्यात येईल याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग,
ता. ५/०५/२०२४

सही/-
**ॲड.सचिन किशोर पाटील**
'श्रीकृपा' भाऊसाहेब लेले चौक,
जुन्या नगरपालिकेसमोर, अलिबाग
ता.अलिबाग जि.रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी दिलेल्या सुचनेवरून आम्ही मौजे कामथ, ता.अलिबाग, जि.रायगड येथील विद्यमान मालकांच्या नावे असलेल्या खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीच्या मालकी हक्कांच्या निर्वेधतेची पडताळणी करीत आहोत. परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीचे मालकांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत व ती विकणेचा त्यांस पुर्ण हक्क अधिकार आहे.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतीमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट अे.डी. द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतीमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायम स्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व मिळकतीचे विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहेत असे गृहित धरून आमचे अशिल विक्री व्यवहार पुर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**

**मौजे कामथ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार रू. पैसे | मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ३१ | ०-०१-५० | ०.०५ | संगीता शशिकांत काठे,<br>राहुल शशिकांत काठे,<br>चेतन शशिकांत काठे,<br>साधना अनंत काठे,<br>नंदकिशोर अनंत काठे,<br>दिपक अनंत काठे,<br>महेश अनंत काठे,<br>निलेश अनंत काठे |

अलिबाग
तारीख : ५/५/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल मे. साई डेव्हलपर्स, पत्ता-मुद्रे खूर्द, ता. कर्जत, जि. रायगड यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेले मालक मे विजय बिल्डकॉन तर्फे भागीदार अम्मार आबिद दारूवाला यांचेकडून विकसनाकरीता घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाने कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र, विकसन करार वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या विकसनाच्या कार्यास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या संबंधित विकसन करार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे मुद्दे खुर्द, ता. कर्जत, जिल्हा रायगड येथील बिनशेती मिळकत**

| सर्व्हे नं/हिस्सा नं. | प्लॉट क्र. | क्षेत्रफळ आर-चौ-मी | आकार रू-पै |
|---|---|---|---|
| ९/३अ | ४ | ३-१५-१३ | ६.३० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता:-फ्लॅट नं.४, ए विंग, पहिला मजला,
गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका शेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१.

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक:-०५/०५/२०२४
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल:adv.jayeshmhase@gmail.com

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रामचंद्र दशरथ चव्हाण, रा. चौलनाका, पो. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली भातशेती मिळकत माझे स्नेही श्री. सागर शशिकांत वाकले, मु.पो. किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | जु.स.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| चौल | ८७८/२ | | ०-१८-७५ | ४.२४ |
| ता.अलिबाग | | पो.ख. | ०-००-५० | |
| | | एकूण | ०-१९-३५ | |

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०४/०५/२०२४

सही/-
**जयवंत दत्तात्रेय म्हात्रे**
पत्ता : रा. थेरोंडा (धाकलीवाडी), पो. चौल
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक अर्जुन खंडू तुपे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे मांडवणे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| १२४/१३ | ०-०६-०० हे आर पॉ | ०-०५ |
| १२५/१ | ०-०४-३० हे आर पॉ | ०-०८ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०८ (आठ) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०५/०५/२०२४

**ॲड. निलेश कान्हु मोरे मोबा. ९८२२६९११०९**
**ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा.८५३०१४६८५४**
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **विहिरी** – आपल्या शेतीवाडी बंगल्यात पाण्याच्या सोयीसाठी सिमेंट कॉंक्रीट रिंगाचे विहीर करून घेण्यासाठी व नळाचे पाणी साठविण्यासाठी पाण्याची टाकीसाठी संपर्क रणजित पाटील-अलिबाग फोन- ९८३४३०३९४१/९८८१६३७०४७
- **बोअरवेल-विहिरीसाठी** मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९
- **शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग** शाखेत सर्वजातीय वधूवरांची नावनोंदणी ४८ शाखा, वेबसाईट नोंदणीसाठी -९२२६७६६१२९
- **175 sq.ft** दुकान गाळा, भाड्याने देणे आहे बे-वूड्स कॉम्प्लेक्स, गोंधळपाडा, अलिबाग ८८०५०२२३२०/८८०६३३१०००
- **प्रथम, पुर्नविवाह, व्यंग,** सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- **चेंबूर पूर्व मुंबई येथे स्टेशन जवळ** ८६६ स्क्वेअर फूट कारपेट बालकनी सह १ कारपार्किंग नवीन टॉवर ॲमेनीटी सह ताबा ३ महिन्यात मिळणार १० वा मजला नवीन कॉम्प्लेक्स मध्ये फ्लॅट विकणे आहे. मोबाईल : ९८२१२११४८०/९५७७२१६४९९
- **मॉटेसरी टीचर, आया (attendant) व पार्ट टाइम बेकरी शेफ हवा आहे.** आया किड्स ॲक्टीव्हीटी सेंटरसाठी व Owner च्या मुलाला सांभाळण्यासाठी हवी असल्याने घरी राहाणारीच बघत आहोत. अनुभवी किंवा जबाबदार व मुलांची आवड असणारी हवी. संपर्क ९९२०७५२१४१/९४२२६९२४५०
- **विद्यानगरमध्ये** Fully Furnished Attached रुम paying Guest साठी देणे आहे. जेवणासकट किंवा जेवणाशिवाय भाडे ठरवता येईल. (लेडीज किंवा मॅरीड कपल्ससाठी) संपर्क : ९९२०७५२१४१
- **अलिबाग-चोंढी येथील रिसॉर्टमध्ये** कामासाठी माणसे पाहिजेत. Receptions-Housekeeping-waiter-Helper-Cook etc. संपर्क- 8208459424/9323152990 Email. csskshrisnkar@gmail.com

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

मौजे थळ, ता.अलिबाग जि.रायगड येथील भुमापन क्र.१५८/२, क्षेत्र ००-३४-९० हे.आर.+ पो.ख.०-०१-०० हे.आर, एकूण क्षेत्र :-०-३५-९० हे.आर, आकार रू.७.८१/- या शेतजमिन मिळकती पैकी ०-१२-०० हे.आर., आकार-रू.२.६९/- क्षेत्राची मिळकत श्री.साई कमलाकर कदम यांच्या हिश्श्यास आली असून ते सदर हिश्श्याचे पुर्ण मालक आहेत व ०-१६-९० हे.आर, आकार-रू.३.७८/- क्षेत्राची मिळकत ही श्री.हेमंत कमलाकर कदम यांच्या हिश्श्यास आली असून ते सदर हिश्श्याचे पुर्ण मालक आहेत.

आमचे अशिलांनी वर नमूद मिळकतीपैकी श्री.साई कमलाकर कदम यांच्या हिश्श्याची मिळकत ०-१२-०० हे.आर, आकार-रू.२.६९/- ही मिळकत व श्री.हेमंत कमलाकर कदम यांच्या हिश्श्याची ०-१६-९० हे.आर, आकार-रू.३.७८/- ही मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १)श्री.साई कमलाकर कदम २)श्री.हेमंत कमलाकर कदम यांच्याकडून कायम विकत घेण्याबाबत व्यवहार ठरविलेला आहे.

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत वरील विद्यमान मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कोणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, हक्कसोडपत्र, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लायन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, अथवा सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात कोणतेही प्रकरण प्रलंबित असल्यास, अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसहीत हरकत सादर करावी.

उक्त मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्विवाद आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील. उक्त मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ०५/०५/२०२४

सही/-
**(ॲड.अजहर एम.घट्टे)**
घट्टेवाडी, मुख्य पोस्ट ऑफिस जवळ, अलिबाग,
ता.अलिबाग जि.रायगड ४०२२०१
मो ९७६३४१८३१४

## नागाव, ता. अलिबाग येथे नारळ फोफळीच्या वाडीत प्लॉट उपलब्ध आहेत.

- शांत परिसर, ● बंगलो कॉटेजसाठी उत्तम. ● प्लॉटमध्ये आंबा, नारळ, सुपारीची झाडे. ● एकट्याच्या मालकीची (singal owner)
- टायटल क्लिअर ● अलिबाग- रेवदंडा रस्त्यालगत
- समुद्रापासुन जवळ ● नागाव बिच १ कि.मी. अंतरावर
- अलिबाग शहर ८ कि.मी. अंतरावर ● किंमत- १२.५० लाख प्रती गुंठा.

**संपर्क : ॲड. पराग गुरव**
८४४६८८०००९
**श्री. मोहित प्रधान**
७७४४०८३५७८

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटिंग

दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटिक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

पान १ वरून

## मतदानाच्या दिवशीच सुनावणी

मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे भ्रष्टाचार करणाऱ्या सुनील तटकरे यांच्याविरोधात तक्रार असताना हे प्रकरण दाबण्यात आले असल्याचा आरोप सय्यद यांनी केला आहे. याशिवाय राष्ट्रवादीमधील एका कार्यकर्त्याच्या सांगण्यावरून या प्रकरणाचा पाठपुरावा केला व संबंधित कागदपत्रे मिळविण्यात आली असून, मुंबई उच्च न्यायालयात तटकरे यांच्याविरोधात फौजदारी रिट पिटीशन दाखल करण्यात आली असल्याचेही सय्यद यांनी सांगितले.

### ‘तटकरेंना मतदान करू नका’

**नाही. त्यामुळे आपले अमूल्य मत तटकरेंना देऊ नका, असे आवाहन भाजप कार्यकर्ते व सामाजिक कार्यकर्ते बबलू सय्यद यांनी केले आहे.**

## पिक्चर अभी बाकी है...

केली होती. यावेळी आ. जयंत पाटील बोलत होते. यावेळी शिवसेना (उद्धव ठाकरे गट) उपनेत्या सुषमा अंधारे, युवक प्रदेश अध्यक्ष महाराष्ट्र राज्य शरद पवार गट महबुब शेख, प्रदेश उपाध्यक्ष अनिल तटकरे, शंकरराव म्हसकर, मुस्लीम मराठी समाजाचे अध्यक्ष सुभान अली, डॉ. रियाज पठाण, शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, अनिल नवगणे, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष सुनील देशमुख, शेकापचे नेते ॲड. सुनील सानप, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक गणेश मढवी, शेकाप रोहा तालुका चिटणीस राजेश सानप, शिवसेनेचे शहर प्रमुख दीपक तेंडुलकर, आम आदमी पार्टीचे प्रवक्ते साबीर पठाण आदी इंडिया आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

याप्रसंगी कार्यकर्त्यांना संबोधित करताना आ. जयंत पाटील म्हणाले की, त्यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपद आहे, दहा मंत्री, महामंडळे आहेत. पण, यांना जागा फक्त चारच मिळाल्या आहेत. त्या चारही जागा पडणार आहेत. आम्ही गोरगरीबांसाठी लढणारे आहोत, कोणताही डाग लावून घेतला नाही. गरीबांशी बांधिलकी ठेवून काम करतो. या निवडणुकीत आमूलाग्र बदल होणार आहे. शेकापक्ष संपविणार असे बोलणाऱ्यांनो पिक्चर अभी बाकी है असा टोला आ. जयंत पाटील यांनी लगावला.

आ. पाटील म्हणाले की, सुनील तटकरेंना ज्यांनी ज्यांनी मदत केली, त्यांच्याच पाठीत खंजीर खुपसण्याचे काम तटकरेंनी केले. ज्या ओटीवर हे मोठे झाले, ती कुळकर्णींची ओटी तशीच राहिली. तटकरे जेवले, चहा प्यायले. पण, कुलकर्णींना जेवण दिल्याचे आठवत नाही. आज मुस्लिम समाज ९० टक्के, दलित, श्रमिक समाज १०० टक्के महाआघाडीच्या पाठीशी आहे. संविधान वाचवण्यासाठी इंडिया आघाडी झाली. आम्ही ७५ वर्षे लढलो, शेकाप गरिबांचा आहे. आमच्यावर एकही डाग नाही. आता तटकरेंसारख्या गद्दाराला गाडायचे आहे. ते पुढे म्हणाले, या जिल्ह्याबरोबरच राज्यातील असंख्य मुस्लीम समाज आपल्यासोबत आहे. दलित समाज आपल्यासोबत शंभर टक्के आहे. हा जिल्हा महाविकास आघाडीने पिंजून काढला आहे. मतदारांना जागरुक करण्याचे काम सुषमा अंधारे आणि सुभान अली यांनी केले आहे. या बदलत्या वातावरणामुळे महाराष्ट्रात सर्वाधिक मते मिळवणारे अनंत गीते असणार आहेत, असा विश्वास आ. जयंत पाटील यांनी व्यक्त केला.

**पोटावर मारण्याचा तटकरेंचा धंदा : समीर शेडगे**

रोह्यामध्ये रुग्णालय व्हावे ही मोठी अपेक्षा आहे. आ. जयंत पाटील यांची साथ मिळाली तर नक्कीच रोह्यात रुग्णालय उभे राहील, असा विश्वास शिवसेनेचे नेते समीर शेडगे यांनी व्यक्त केला. पुढे ते म्हणाले की, करोडो रुपये रोह्याच्या विकासासाठी आणले असल्याच्या बतावण्या तटकरे यांनी केल्या. पण, अनेक कामे अपूर्णच राहिली आहेत. भुयारी गटारे काँक्रिटच्या रस्त्यात गाडली गेली आहेत. या ठिकाणी बांधलेला टाऊन हॉल अपूर्ण राहिला आहे. नगरपरिषदेमध्ये अनेक नगराध्यक्ष होऊन गेले; पण त्यांचे राजकीय अस्तित्व संपविण्याचा प्रयत्न सुनील तटकरेंनी केल्याचा घणाघाती आरोप शेडगे यांनी केला आहे. रोहेकरांना भीती दाखवून मते मिळविण्याचे काम त्यांनी केले आहे. रोह्यातील सर्वसामान्यांची अर्बन बँक तटकरेंनी बंद पाडली. पोटावर मारणे हाच तटकरेंचा धंदा, असा आरोप समीर शेडगे यांनी करीत सात तारखेला मशाल चिन्हावर बटण दाबून अनंत गीते यांना निवडून द्या, असे आवाहन केले.

## अलिबागेत इंडिया आघाडीचा ठाकरी बाणा

दिला आहे. राज्यभरात इंडिया आघाडीच्या रेकार्डब्रेक सभा झाल्या आहेत. रायगड मतदारसंघात फायरब्रॅण्ड नेत्यांनी विरोधकांच्या वक्त्यांना सळो की पळो करुन सोडले आहे. विकासाचे कोणतेच मुद्दे नसल्याने ते फक्त उमेदवार अनंत गीते, शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांच्यावर टीका करण्यातच त्यांचा वेळ वाया गेला आहे. त्यामुळे मतदारांमध्ये भाजपासह सुनील तटकरेंविरोधात चांगलाच असंतोष खदखदत आहे.

अलिबाग येथील समुद्रकिनारी असणाऱ्या जेएसएमच्या मैदानावर दुपारी दोन वाजता जाहीर सभा पार पडणार आहे. सभेची तयारी पूर्ण झाली आहे. गीतेंच्या प्रचारासाठी दस्तुरखुद्द उद्धव ठाकरे मैदानात उतरत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, देवेंद्र फडणवीस, सुनील तटकरे यांच्याबाबत ते काय बोलणार याची उत्सुकता लागली आहे. इंडिया आघाडीच्या घटक पक्षांनी जनतेसाठीचा जाहीरनामा आधीच प्रकाशित केला आहे. देशातील, महाराष्ट्रातील जनतेच्या विकासाचे मॉडेल त्यांनी समोर ठेवले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्ष, चिन्ह सर्व काही चोरुन नेले आहे. तीच अवस्था अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार यांची केली आहे. या कारणांनी जनतेच्या मनामध्ये ठाकरे आणि पवार यांच्या प्रचारसभांना मतदारांचा चांगलाच प्रतिसाद लाभत आहे. रविवारची सभा प्रचाराची अंतिम सभा असणार आहे.

यावेळी इंडिया आघाडीचे उमेदवार तथा माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते, माजी आ. पंडित पाटील, आ. संजय पोतनीस, काँग्रेसचे प्रदेश सचिव ॲड. प्रविण ठाकूर, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, शिवसेना जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक आदींसह शेकाप, शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व इंडिया आघाडीचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या सभेला मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन इंडिया आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.

## सलमान खान गोळीबार प्रकरणाला धक्कादायक वळण

ठेवून घेतला आहे. अनुजचा व्हीसेरा अहवाल राखीव ठेवण्यात आला आहे. दरम्यान, कुटुंबियांनी अनुज थापनचा मृतदेह ताब्यात घेण्याचे मान्य केले. मृतदेह ताब्यात घेऊन विमानाने पंजाबला नेला जाईल. तेथे त्याच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. याबाबत अनुजच्या भावाचा जबाब नोंदवण्यात आला आहे.

दरम्यान, मृत अनुज थापनच्या कुटुंबियांनी उच्च न्यायालयाकडे सलमान खानवर कारवाईची मागणी केली आहे. एवढेच नाही तर, मृताच्या कुटुंबियांनी या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणीही केली आहे. ही आत्महत्या नसून, अनुजच्या मृत्यूमागे षड्यंत्र असल्याचा आरोप थापनचे कुटुंबीय आणि वकिलांनी केला असून, त्याची सीबीआयमार्फत चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## कर्जतचा तरुण बनला कर्नल

येथील श्री गजानन माध्यमिक विद्यालयात माध्यमिक शिक्षण घेतलेल्या संजूने पुढे आपल्या गावाच्या हद्दीत असलेल्या तासगावकर संस्थेत पॉलिटेक्निक पदविका शिक्षण घेतले. इथवर तो थांबला नाही, तर कर्जत येथील कोकण ज्ञानपीठमध्ये मेकॅनिकल इंजिनीयर ची पदवी २०१९०मध्ये पूर्ण केली. घरची परिस्थिती हालाखीची असल्याने त्याने अभियांत्रिकी मधील चांगल्या गुणांच्या जोरावर मारुती सुझुकी कंपनीमध्ये सर्व्हिस इंजिनिअर पदावर नोकरी सुरू केली.तेथे पाच वर्षे काम करीत असताना चांगला अनुभव गाठीशी मिळाल्याने स्पर्धा परीक्षा मध्ये धावपळ करीत असताना मुंबई मोनोरेलमध्ये कर्नलपदासाठी जाहिराती निघाल्या. तेथे मुलाखतीमध्ये १५ स्पर्धकांना मागे सारत पहिला क्रमांक पटकावला. संजू कोळंबे याच्या यशाबद्दल त्याचे कौतुक होत आहे.

## कांदा निर्यातबंदी उठवली

६४ रुपये प्रति किलोपर्यंत जाणार आहे. निर्यातीचा खर्च पाहता संबंधित देशात भारतीय कांदा पोहोचेल तेव्हा त्याची किंमत ७० ते ७५ रुपये प्रति किलोपर्यंत पोहोचणार आहे. संबंधित देशात ३० रुपये ते ५० रुपये प्रतिकिलोप्रमाणे कांदा उपलब्ध असल्यामुळे ७० ते ७५ रुपये प्रतिकिलो किमतीचा भारतीय कांदा तेथे कुणी घेणार नाही. परिणामी, निर्यातबंदी उठवली असली तरी प्रत्यक्षात कांद्याची निर्यात होणार नाही, असे किसान सभेने म्हटले आहे.

केंद्र सरकारचा अटी-शर्तींचा हा खेळ शेतकरीविरोधी असून, एकीकडे दिल्यासारखे करायचे आणि दुसरीकडे मात्र अटी-शर्ती लागू करून शेतकऱ्यांना कोणताही दिलासा मिळणार नाही यासाठी डावपेच आखायचे, अशी कृती केंद्र सरकारने केली आहे. केंद्र सरकारने अटी-शर्तींचे हे डावपेच थांबवावेत व कांद्याची निर्यात बंदी संपूर्णपणे उठवून विनाअट कांदा निर्यातीसाठी प्रोत्साहन द्यावे, अशी मागणी किसान सभेचे केंद्रीय सहसचिव डॉ. अजित नवले यांनी केली आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे भालिवडी, ता. कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक राहुल शशिकांत वाघमारे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २९ | २ | ०-४६-०० पैकी विकत दिलेले क्षेत्र ०-२३-०० | ०-३८ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०५/०५/२०२४

पत्ता - गाळा नं. ०९,कोर्ट व्हयू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**ॲड. समीर आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
मो.नं. ९१५८३१३७३३


## प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची निर्दोष सुटका



**। उरण । वार्ताहर ।**

उरण रेल्वे स्टेशन जमीन संपादनाच्या बदल्यात मोबदला आणि रोजगार मिळावा म्हणून उरण कोटनाका, काळाधोंडा येथील स्थानिक रेल्वे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या वतीने लोकशाही व कायदेशीर मार्गाने साखळी उपोषण आणि आंदोलन करण्यात आले होते. मात्र, तरीही या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल झाले होते. हे प्रकरण उरण न्यायालयात गेले. उरण न्यायालयाने सर्व आंदोलकांची निर्दोष सुटका केली आहे.

उरण रेल्वे स्टेशनने नव्याने बांधकाम सण २०१३ मध्ये सुरू केले होते. त्यावेळी शेतकऱ्यांना कोणतीही नोटीस न देता काम सुरू केले होते. याविरोधात सर्व रेल्वे प्रकल्पग्रस्त शेतकरी व कोट गाव ग्रामस्थांनी २०१९ मध्ये साखळी उपोषण आणि आंदोलन पुकारले होते. त्यावेळी उरण पोलिसांनी काही राजकीय दबावाला बळी पडून आंदोलक निलेश गणपत भोईर, सुनील गजानन भोईर, कृष्णा जोशी या शेतकरी प्रकल्पग्रस्तांवर उरण पोलीस ठाण्यात २०२१ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या खटल्याची अंतिम सुनावणी झाली असून, उरण न्यायालयाचे न्यायाधीश निलेश वाळी यांनी आंदोलनकर्त्यांची दि. २ मे रोजी निर्दोष सुटका केली. आंदोलनांच्या वतीने ॲड. पराग म्हात्रे यांनी कामकाज पाहिले.

## कावीळ वैद्य शिवाजी राणेंचे निधन



**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील परहूरपाडा येथील प्रसिद्ध कावीळ वैद्य व घोडेवाले शिवाजी (अण्णा) बाबाजी राणे (८१) यांचे शनिवार, दि.२७ एप्रिल रोजी दुपारी चार वाजतच्या दरम्यान अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाबाबत हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. शिवाजी राणे हे शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते होते. तसेच ते को.ए. सो. कै. ध.श. खोपकर परहूर शाळेचे सदस्य होते.

अलिबाग तालुक्यात ते शिवा राणे म्हणून ओळखले जात होते. ते एक उत्तम कावीळ वैद्य म्हणून प्रसिद्ध होते. कावीळ आजारासह इतर आजारांवर ते खात्रीशीर आयुर्वेदिक उपचार करत होते. त्यांना पूर्वीपासून घोडे पाळण्याची हौस होती, त्यांना बैलगाडी व घोडागाडी शर्यतप्रेमी म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या अंतिम दर्शनासाठी व अंत्यसंस्कारावेळी अलिबाग तालुक्यातील सामाजिक व राजकीय क्षेत्रातील तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पार्थिवावर परहुरपाडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया व बारावे विधी सोमवार, दि.६ मे रोजी या एकाच दिवशी परहुरपाडा येथील राहत्या घरी होणार आहे, अशी माहिती कुटुंबियांनी दिली.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. ५ ते ११ मे २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

### जोडीदाराची साथ मिळेल

**मेष :** राशीधारकांना आपले ग्रहमान पाहता भौतिक सुखांमध्ये वृद्धी होईल. मिळकतीचे नवे मार्ग उघडतील. जुन्या समस्या निरोप घेण्याच्या मार्गावर आहेत. नव्या संपर्कांचा फायदा होईल. भौतिक सुखांमध्ये वृद्धी होईल. मिळकतीचे नवे मार्ग उघडतील. नोकरी किंवा व्यवसाय संबंधाने शहराच्या बाहेर जाण्याचे योग आहेत. हा सप्ताह साधारण असला तरी स्वास्थ्य ठीकठाक राहील. जोडीदाराची साथ मिळेल. तुमच्या बोलण्याचा मान राखला जाईल. धार्मिक कार्यात आवड वाढेल. तब्येत ठीक करण्यासाठी सकाळी फिरायला जावे. मनासारखी स्थळं न मिळाल्याने निराशा राहील. वडील आणि भावाशी वाद होतील. वाहन चालवताना अति-दक्ष राहण्याची आवश्यकता आहे. मद्यपान करताना संयम ठेवा. जुनी थांबलेली कामे मार्गी लागतील. कोणालाही खोटे आश्वासन देऊ नका, पाऊस चांगला झाल्याने शेतकऱ्यांनाही फायदा होईल. विरोधक शांत राहतील. **महिलांना :** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. **शुभ दिनांक** - ६, ७.

### कलागुणांना प्रोत्साहन मिळेल

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता विद्यार्थ्यांना कोणत्याही विषयाचा खोलवर अभ्यास करताना आपली आकलनशक्ती कमी असल्याचे जाणवेल. तरीही त्यांना अभ्यासाची गोडी लागल्याने उत्तरार्धात त्याचे चांगले परिणाम मिळू शकतील. त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. कामाशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी आपण कष्ट कराल. नवीन मैत्री करताना सावध राहण्याचा सल्ला देण्यात येत आहे. आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे. नोकरदारांना दिलासा मिळेल. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. **महिलांना :** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. पर्स भरलेली राहील **शुभ दिनांक-** ०५,११

### वरिष्ठांशी जुळवून घेणे फायद्याचे

**मिथुन :** आपले ग्रहमान पाहता दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत. आरोग्याच्या बाबतीत जे मागील काही दिवसांपासून आजारी होते त्यांना काहीसा दिलासा मिळेल. ज्यांना ॲलर्जी, त्वचा विकार किंवा एखादी जुनी समस्या असेल तर त्यांना उत्तरार्धात दिलासा मिळू शकेल. प्रणयी जीवनात पुढील वाटचाल गुलाबी होण्याची किंवा नवीन संबंधांची सुरुवात होण्याची शक्यता आहे. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तींचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **महिलांना :** आपली माहेरची माणसे घरी येतील, त्यांची ऊठबस करावी लागेल, कामात असताना तब्बेतीकडे दुर्लक्ष करू नका, घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला, त्यामुळे मनावर ताण येणार नाही. आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. **शुभ दिनांक-** ०६, ०७

### आरोग्याची काळजी घ्या

**कर्क :** राशीधारकास या सप्ताहात आपण ह्या कालावधीत आरोग्यास विशेष काही त्रास होण्याची शक्यता नसली तरी पहिल्या तीन दिवसात पित्त प्रकोप, पोटात जळजळ, पायांच्या स्नायूंचे दुखणे होण्याची शक्यता आहे. शक्य तितका स्वभावातील उग्रपणा नियंत्रित ठेवलात तर संबंधात दुरावा निर्माण होणार नाही. प्रिय व्यक्तीच्या सहवासाचा आनंद उपभोगू शकाल. एखाद्या रमणीय स्थळी फिरावयास किंवा छोटाशा प्रवासास जाऊन आनंदात वेळ घालवू शकाल. पूर्वार्धात विद्यार्थ्यांना परिश्रम वाढवावे लागले तरी उत्तरार्धात त्याचे चांगले फळ मिळू शकेल. बौद्धिक प्रवृत्ती व चर्चेस आपण प्राधान्य द्याल. पूर्वार्धात आपणास आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. वाहन चालवताना काळजी घेण्याचा सल्ला देण्यात येत आहे. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास **महिलांना :** हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. महिलावर्गाला सासूरवाडीकडून काही शुभ संकेत मिळतील. महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून, त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. **शुभ दिनांक** - ०८,०९

### नोकरीत पदोन्नतीचे योग

**सिंह :** राशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. व्यवसायात आपली बौद्धिक क्षमता प्रदर्शित झाल्याने नोकरीत पदोन्नती होऊ शकेल. व्यापाऱ्यांना दूरवरचे सौदे प्राप्त होण्याची शक्यता आहे. जे मुद्रण, रसायन, औषधे, शासकीय कार्य किंवा कंत्राट इत्यादींशी संबंधित आहेत त्यांना उत्तरार्ध अधिक फलदायी होऊ शकेल. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पूर्वार्धात चांगली संधी मिळू शकेल. मात्र, व्यापक विचार केल्यास आपणास अभ्यासातील एकाग्रता वाढवावी लागेल. विद्यार्थ्यांना अभ्यासातील समस्यांचे निराकरण झाल्याने दिलासा मिळेल. तरी उत्तरार्धात विशेषतः रक्तदाब, हृदयाच्या ठोक्यांची अनियमितता किंवा डोळ्यांची जळजळ इत्यादी समस्या होण्याची शक्यता आहे. **महिलांना :** नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा, मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. नोकरीत त्रास होईल.आर्थिक स्तरावर त्रासात राहू शकता, जोडीदाराचे वागणेही तुम्हाला त्रासात टाकू शकते. आपले प्राधान्य हे आपल्या कामांनाच असेल. **शुभदिनांक** - ६,१०

### धनप्राप्तीसाठी उत्तम काळ

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहात सुरवातीला तुमचे शत्रू तुमचे काम बिघडवण्याचा प्रयत्न करतील. व्यापारसंबंधित लोकांना नुकसान होऊ शकते. असे झाले तरी तुम्हाला वरिष्ठ लोकांचे आणि कुटुंबातील मोठ्यांचे भरपूर साहाय्य मिळेल. नकोसे खर्चही वाढू शकतात. नव्या जबाबदाऱ्या मिळू शकतात. पदोन्नती मिळण्याची शक्यता आहे. मिळकतीचे स्त्रोत वाढतील. धनप्राप्तीचे योग आहेत. सामाजिक कार्यात तुम्ही सतत तत्पर राहाल. प्रेम-प्रसंग विवाहापर्यंत पोहोचण्याचे योग आहेत. आई-वडिलांच्या बोलण्याकडे पूर्ण लक्ष द्या, नाहीतर ते नाराज होऊ शकतात. पण व्यवस्थित समजवल्याने त्यांची नाराजी दूर होऊ शकते. स्वास्थ्य उत्तम राहील. कोणतेही नवे काम करण्याआधी त्याच्या प्रत्येक पैलूचा बारकाईने विचार करा. जोडीदारचे हवेत प्रेम आहे, त्याचा फायदा घ्या. कुठलीही गोष्ट मिळवण्यासाठी तुम्ही केलेली घाई-गडबड, नुकसान करू शकते. **महिलांना-** वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. आपण एखाद्या अशा व्यक्तीप्रती आकर्षित व्हाल की जी आपल्याहून वयाने अधिक मोठी किंवा लहान असेल. **शुभदिनांक-** ७,९

### व्यवसायात चांगले लाभ

**तुळ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण व्यावसायिक आघाडीसाठी पूर्वार्ध अधिक अनुकूल आहे. व्यावसायिक आघाडीवर प्रतिस्पर्धी व शत्रूंवर आपण मात करू शकाल. आपल्या कौशल्याच्या जोरावर आपण लोकांच्या प्रशंसेस पात्र व्हाल. नोकरी करणाऱ्यांच्या कामात व विचारात सर्जनात्मकता दिसून आल्याने पदोन्नतीची शक्यता नाकारता येत नाही. उत्तरार्धात शासकीय व कायदाबाबत अडथळे येऊ शकतात. उत्तरार्धात आपली प्रतिमा मलीन होईल अशा कार्यांपासून दूर राहावे. पूर्वार्धात पिता किंवा वडीलधाऱ्या व्यक्तींकडून लाभ होईल. परंतु, उत्तरार्धात पैतृक संपत्तीशी संबंधित कार्यात विघ्ने येण्याची किंवा अपेक्षेनुसार फलप्राप्ती न होण्याची शक्यता आहे. मित्र, पत्नी, संतती ह्यांच्याकडून लाभ होईल. स्त्री मित्रांकडून लाभ होईल. **महिलांना-** दांपत्य जीवनातसुद्धा पारंपरिक विचारातील प्रगल्भतेमुळे एकमेकांच्या सहवासाचा अत्युच्च आनंद उपभोगू शकाल. पती-पत्नीत आपल्या दोघात एकमेकांप्रतीचे आकर्षण टिकून राहील. आरोग्याच्या दृष्टीने पूर्वार्ध चांगला आहे त्याचा आनंद घ्या **शुभदिनांक-** ८,१०

### गृहसाजवटीसाठी खर्च कराल

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता पूर्वार्धात चिंतन करून आपण आपल्या काही दोषांचेसुद्धा निराकरण करू शकाल. थोड्या प्रतिकूलतेस सामोरे गेल्यानंतर आपणास हळूहळू दिलासा मिळू लागेल. उत्तरार्धात गृहसजावटीचे कार्य हाती घ्याल. अतिरिक्त कामामुळे शरीरास थोडा थकवा जाणवला तरी त्यामुळे आर्थिक लाभ होण्याची शक्यता असल्याने आपण काही तक्रार करणार नाही. व्यावसायिक आघाडीवर आपल्या कष्टाचे फळ मिळू लागेल. सुरुवातीस आपली कामे नियोजनानुसार पूर्णत्वास नेण्यात परिश्रम करावे लागले किंवा आपले फासे उलटे पडले तरी निराश न होता प्रयत्न चालू ठेवल्यास उत्तरार्धात यश प्राप्ती होऊन आपणास मानसिक दिलासा मिळेल. पूर्वार्धात नोकरीत वरिष्ठांशी काही कारणाने वाद होणार नाहीत ह्याची काळजी घ्यावी. कायद्याविरुद्ध कार्ये किंवा अनैतिक कार्ये करून आर्थिक प्राप्ती करण्याचे विचार मनातून काढून टाका. **महिलांना-** आपल्या प्रिय व्यक्तीसाठी एखादी सुंदर वस्तू खरेदी करण्यासाठी आपण खर्च कराल. प्रिय व्यक्ती, मित्र, नातेवाईक यांच्या सहवासात बहुतांश वेळ घालवाल. **शुभ दिनांक-** ९,११

### कुटुंबियांसोबत बाहेर जाण्याचे योग

**धनु :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण ह्या साप्ताहात कौटुंबिक आघाडीवर एखाद्या व्यक्तीशी आपल्या वागणुकीत उग्रता दिसून येईल. वाणी व वर्तनात काठिण्य राहील, तेव्हा काळजी घ्यावी. कोणत्याही बाबतीत हट्ट सोडण्याचा सल्ला देण्यात येत आहे. हे सर्व आपण कुटुंबाप्रती अति संवेदनशील झाल्यामुळेच होणार असले तरी आपल्या भावना समजून घेण्यास कुटुंबियांना थोडा वेळ लागेल. त्यांच्या खुशीसाठी आपण वाहन, इलेक्ट्रॉनिक वस्तू किंवा अन्य एखादी मोठी वस्तू खरेदी करण्याची शक्यता आहे. त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सध्या व्यावसायिक आघाडीवरसुद्धा अतिरिक्त परिश्रम कराल. घरातील संबंधात थोडी काळजी घ्यावी लागेल. विशेषतः जे आधीपासूनच दुर्लक्ष करत आहेत, त्यांना प्रिय व्यक्तीशी संबंधित एखाद्या बाबतीत सतत काळजी वाटेल. सध्या व्यापारसंबंधात आपणास थोडी अनिश्चितता जाणवेल. **महिलांना-** विवाहेच्छुकांना जोडीदाराची निवड विचारपूर्वक करावी लागेल. उत्तरार्धात प्रियजनांसह बाहेर फिरावयास जाण्याचे तसेच भोजनाचे आयोजन करू शकाल. **शुभदिनांक-**१२,१३

### स्वप्न सत्यात उतरतील

**मकर :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता पूर्वार्धात विद्यार्थ्यांचा अभ्यास उत्तम झाला तरी उत्तरार्धात कोणत्याही विषयाचे खोलवर अध्ययन करण्यासाठी अधिक कष्ट करण्याची तयारी ठेवावी लागेल. या पूर्वार्धात व्यावसायिक आघाडीवर आपल्या कामांना गती येईल. आपल्या शब्दांचे मोल वाढेल. जी स्वप्ने मागील कालावधीत बघितली असतील, ती आता प्रत्यक्षात येतील. आपल्या अंतर्ज्ञानात व कल्पनाशक्तीत भर पडेल. आपण आशावादी व सकारात्मक वृत्तीचे आचरण कराल. काही वेळा आपली गती मंदावली गेली तरी आपल्या वाटचालीत व निर्णयात ठामपणा नक्कीच राहील. आपणास नवीन व चांगल्या कार्याकडे लक्ष द्यावेच लागेल. आपण गृहस्थजीवनाससुद्धा योग्य महत्त्व देऊन त्यानुसार वाटचाल करण्याची तयारी ठेवाल. **महिलांना-** कुटुंबाप्रती आपला कल वाढत असल्याचे दिसून येईल. सप्ताहाच्या शेवटी आपली मनोरंजनाची इच्छा प्रबळ होईल. सामाजिक किंवा धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. समाजाप्रती आपले ऋण चुकविण्यासाठी आपण सक्रिय व्हाल. फिरण्याचा बेत पूर्ण करू शकाल **शुभ दिनांक-** ५,७

### महागड्या वस्तू भेट मिळतील

**कुंभ :** या सप्ताहाचे ग्रहमान पूर्वार्धात आपणास पत्नी, संतती, वडीलधारी व मित्र परिवाराकडून सुखद बातम्या मिळण्याची किंवा त्यांच्यामुळे काही फायदा होण्याची शक्यता आहे. कुटुंबियांकडून एखाद्या महागड्या वस्तूंची भेट मिळण्याची अपेक्षा बाळगू शकता. ह्या सप्ताहात कोणत्याही बौद्धिक प्रतिभेशी संबंधित कार्ये, चर्चा इत्यादीदरम्यान थोडी काळजी न घेतल्यास आपणास खोटे ठरविण्यात येण्याची किंवा आपल्या हातून चुकीचे निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे. आपली विश्लेषण शक्ती मंदावल्यामुळे जेथे बुद्धीची नाही तर श्रमांची गरज असेल अशा गोष्टींकडे विशेष लक्ष द्यावे. सरकारी व कायदाकीय कारणांसाठी खर्च होऊ शकतो. **महिलांना-** आपली प्रतिमा मलीन होईल अशा कार्यापासून दूर राहावे. सध्या कोणास जामीन राहू नये. बँकेतसुद्धा कोणास जामीन राहू नका. संबंधातील अत्युच्य आनंद उपभोगू शकाल. त्यातसुद्धा उत्तरार्धात भिन्न लिंगी व्यक्तीशी खूप जवळीक साधू शकाल. ह्या सप्ताहात उत्तरार्धात हृदयाच्या ठोक्यांची अनियमितता, पाठदुखी ह्यांचा त्रास संभवतो. **शुभ दिनांक-** ६,९

### कुटुंबात सुख-शांती नांदेल

**मीन :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता प्रतिस्पर्धी व शत्रूंवर आपण मात करू शकाल. एकंदरीत भाग्यवृद्धीचा काळ आहे. आपल्या मनात विविध विचारांचे तरंग उमटतील. कुटुंबात सुख-शांती नांदेल. विवाहेच्छुकांच्या विवाहाचा मार्ग मोकळा होईल. भिन्नलिंगी व्यक्तींप्रती आकर्षित व्हाल. मात्र, संबंधात आपला अहंकार बाजूस सारावा लागेल. नवीन प्रकल्पांची सुरवात करू शकाल. प्रियव्यक्तीच्या सहवासाने आनंदित व्हाल. वडिलधाऱ्यांशी आपले संबंध सुधारतील. आपले आरोग्य उत्तम राहील. आजवर केलेल्या कामामुळे यश व कीर्ती ह्यात वाढ होऊन आणखी काही करण्याचा उत्साह निर्माण होईल तसेच आपल्या आत्मविश्वासात वाढ होईल. पाहुणे व मित्रांसह भोजनाचे आयोजन होऊ शकेल. नवीन वस्त्रालंकार व वाहन खरेदी करू शकाल. उत्तरार्धात आपल्या आरोग्यात उल्लेखनीय सुधारणा होऊन चेहऱ्यावर त्याचे तेज दिसून येईल. **महिलांना-** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. खिसा पाकीट भरलेले राहील. **शुभ दिनांक-** ७,११

मोहोर

# चारशे पार की मेहनत बेकार ?

आचार-विचार

विलास पवार

**२०१९ मधील आणि त्या अगोदरच्या निवडणुकी मोदींचा चेहरा विकासपुरुष आणि लोकप्रिय होता, परिणामकारक होता. यावर्षी तशी स्थिती नाही. सर्वसामान्यपणे महाराष्ट्रात तर मतदार आणि जनता एका वेगळ्याच वैचारिक संघर्षात आहे. एकीकडे प्रबळ विरोधी पक्षच नाही. आणि दुसरीकडे भाजपाने फोडलेले आणि भाजपात जाण्यापासून वेगळे राहिलेले असे दोन गट आहेत मग ते पक्ष राष्ट्रवादी असो, शिवसेना असो किंवा काँग्रेस असो! यातून मतदारांचा कल कोणत्या बाजूने जाणार आहे. यावरच निवडणुकांचा निकाल ठरला जाऊ शकतो.**





प्रत्येक पक्षाने निवडणूक लढवताना जाहीरनामा स्पष्ट केला आहे. अधिकाधीक उमेदवार निवडून येण्याचा प्रयत्न प्रत्येक पक्ष करणार आहे. चारशे पारचा अजेंडा भाजपाने ठेवला आहे. अर्थात तो चुकीचा नाही. या अगोदरच्या म्हणजे २०१९ लोकसभा निवडणुकीत भाजपाने ३०३ जागा जिंकल्या होत्या. त्यामुळे ३०३ जागा यावेळी मिळणारच आणि त्यातूनच ३०३ थोडा है थोडे की जरूरत आहे अशा पद्धतीने अब की बार चारशे पार चा नारा भाजपाने दिला आहे. याचवेळी भाजपा इतर पक्षाने यावेळी भाजपाला सत्ता देऊ नये. यासाठी जनतेचे प्रबोधन सुरू ठेवले आहे. तसं पाहायला गेले तर ३०३ पेक्षा कमी जागा भाजपाला मिळाल्या तरी २७२ पेक्षा जास्त जागा मिळाल्या तरी साध्या बहुमताच्या आधारावर केंद्रात भाजपाची सत्ता येणे दुरापास्त नाही. परंतु ३०३ पेक्षा कमी जागा मिळणे याचा अर्थ जनाधार दुरावला आहे. असाच निघणार. नेमके भाजपाला हेच नको आहे. ४०० पार हा नारा देण्यामागे कारण नेमके हेच आहे.

२०१९ मध्ये पुलवामामधील दहशतवादी हल्ल्यानंतर देशात बदललेले वातावरण, मोदींची किमयागिरी या सर्वांच्या परिणामाने भाजपाचा ३०० पार पराक्रम पोहचला. पण प्रश्न हा आहे की आज फक्त मोदींचा चेहरा, मोदींचा पराक्रम यावर आधारीत अजेंडाने भाजपा चारशे पार जाणार आहे का? 'अब की बार मोदी सरकार' हा नारा लोकप्रिय करताना सर्व भारतात मोदींचा चेहरा प्रत्येक राज्यात तितकाच प्रभावशाली राहणार आहे का? अब की बार भाजपा सरकार! हा नारा कदाचित संयुक्तिक वाटला असता. या चारशे पारच्या उद्दिष्टांमुळे. महाराष्ट्रात इतके चित्रविचित्र प्रयोग झाले आहेत की राजकारणातली भूमिका, निष्ठा, संवेदना. महत्वाकांक्षा या सगळ्यांचा जणू काय बाजारच मांडला गेला. सर्वसामान्य जनतेला,साधारण मतदाराला प्रश्नच पडला आहे की कोणत्या राजकीय प्रणालीला आपण मन दिले? आपला उमेदवार आणि त्यांचा पक्ष त्याला निवडण्यासाठी मत दिले होते. त्याच असं काय झालं? सुरा भोपळ्याचे सख्य पेक्षा दाट सख्य परस्पर विरुद्ध पक्षांकडेच एकी पाहायला मिळते आहे.

भाजपाचा नारा ४०० पार, असा आहे आणि त्यांच्याबरोबर असलेल्या,विरुद्ध असलेले आणि मुख्य साथीदार असलेले राष्ट्रवादी (शरद पवार), राष्ट्रवादी (अजित पवार) शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, शिवसेना एकनाथ शिंदे यांच्या व्यतिरिक्त काँग्रेस यांनी सर्वांनी ही निवडणूक महत्त्वाची ठरवलेली आहे. भाजपासारख्या हिंदूत्वाचा आणि सैद्धांतिक विचार मांडणाऱ्या पक्षाने इतर पक्षांच्या फाटाफूटीने आपल्या बरोबर फुटीरवादी घेतले लक्ष्य एकच चारशे पार! त्याचबरोबर राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार), शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि काँग्रेस यांनी एकमेकांशी परस्पर वैचारिक सैद्धांतिक विरुद्ध विचार प्रणाली असतांना संघटीत होऊन निवडणूक लढवायची ठरवली आहे.त्यांच लक्ष्य भाजपा सत्तेबाहेर जायला पाहिजे. या सर्वांमध्ये सर्वसाधारण जनता,सर्वसाधारण मतदार यांना जवळपास गृहित धरले गेले आहे. याचा परिणाम आता स्पष्ट होऊ लागला आहे. २०१९-२०२४ च्या पहिल्या टप्प्यातील मतदानापेक्षा सात टक्के मतदान कमी झाले आहे.

निवडणुकांच्या एकूण सहा टप्प्यांमध्ये जर मतदारांची आकडेवारी घसरली तर भाजपाला अपेक्षित चारसो पार चा अजेंडा पूर्ण करणे अशक्य होऊन जाईल. याचा विचार केला तर भाजपाच्या २०१९ मधील कामगिरीकडे पाहायला लागेल. भाजपाने बिहारमध्ये ४० पैकी ९, कर्नाटकमध्ये २८ पैकी २५ मध्यप्रदेशमध्ये २९ पैकी २८, महाराष्ट्रात ४८ पैकी ४१ (युती असताना) ओडिशामध्ये २१ पैकी ८, राजस्थानमध्ये २५ पैकी २४, उत्तरप्रदेशमध्ये ८० पैकी ६२, प. बंगालमध्ये ४२ पैकी १८ जागा जिंकल्या होत्या. भाजपाने काही राज्यामध्ये सर्वच्या सर्व जागा सुद्धा जिंकल्या होत्या. त्यामध्ये दिल्ली-७, हरियाणा-१०, गुजरात-२६, हिमाचल प्रदेश-४, झारखंड-११, उत्तराखंड ५ हे राज्य आहे. यातील जवळ जवळ ५० टक्के मते मिळविली होती. हे सर्व करुन भाजपाला ३०३ चा टप्पा मिळविता आला होता. ही मताची टक्केवारी व त्यावेळेचा भाजपाचा निवडणुकीचा मुद्दा आणि आता २०२४ लोकसभा निवडणुकीचा मुद्दा यात फरक आहे. २०१९ मधील आणि त्या अगोदरच्या निवडणुकीत मोदींचा चेहरा विकासपुरुष आणि लोकप्रिय होता, परिणामकारक होता. यावर्षी तशी स्थिती नाही. सर्वसामान्यपणे महाराष्ट्रात तर मतदार आणि जनता एका वेगळ्याच वैचारिक संघर्षात आहे. एकीकडे प्रबळ विरोधी पक्षच नाही. आणि दुसरीकडे भाजपाने फोडलेले आणि भाजपात जाण्यापासून वेगळे राहिलेले असे दोन गट आहेत मग ते पक्ष राष्ट्रवादी असो, शिवसेना असो किंवा काँग्रेस असो! यातून मतदारांचा कल कोणत्या बाजूने जाणार आहे. यावरच निवडणुकांचा निकाल ठरला जाऊ शकतो.

समान नागरी संहिता, एक देश एक निवडणूक २०४७ पर्यंत विकसित भारत २०३६ मध्ये भारतात ऑलिम्पिक स्पर्धा या सर्वांची भाजपाने मतदारांना आकर्षण दाखवले आहे, ही मोदींची गॅरंटी आहे की मागच्या २०१९ च्या निवडणुकीत दाखवलेले निवडणुकीतील अमिषे नंतर जुमले म्हणून जाहीर केले गेले, तसेच यावर्षीसुद्धा होणार आहे की हे निवडणुकीच्या निकालानंतर सत्तास्थापनानंतर ठरले जाईल. महाराष्ट्राच्या वाट्याला मात्र या राजकीय स्थित्यंतरांचा काय फायदा झाला हा विषय मात्र संशोधनाचाच ठरणार आहे. सध्या तर निवडणुकांच्या टप्प्याटप्प्याने होणाऱ्या कार्यक्रमाने उमेदवारांचे भवितव्य मतदारांकडून बंदिस्त होत आहे. या निवडणुकीत निवडून आलेल्या दिग्गज उमेदवारांना भाजपाने डच्चू दिला आहे.

महाराष्ट्रात उमेदवार निवडताना दिरंगाई सर्वांनाच पहायला मिळाली आहे. फक्त मोदींचा चेहरा या निवडणुकीत पुरसा नाही याची जाणीव भाजपाला आहे आणि त्यानुसारच रणनिती आखली गेली आहे आणि अजून सुद्धा आखली जात आहे. भाजपाच्या यशस्वी पराक्रमाला रोखणाऱ्या विरोधकांनी सुद्धा भाजप को आने नही देंगे हे सूत्र धरून संघटीत झाले आहेत. उमेदवारांचे जागा वाटपांमध्ये दोन चार जागा सोडता विरोधकांमध्ये एकमतच अजूनपर्यंत दिसत आहे. याउलट अनेक उलाढाली, अनेक कुरापती करून भाजपा आण फुटीरवादी संलग्न पक्षांना उमेदवारांची निश्चित शेवटपर्यंत नाही. या सर्वांचा परिणाम भाजपा चारशे पार की सत्ता स्पर्धेबाहेरून याचा निर्णय येत्या काही दिवसातच स्पष्ट होईल तोपर्यंत मतदारांच्या आचार विचाराला शुभेच्छा घ्याव्याच लागतील. **

# 'गावातील लग्नसोहळा'



कोकणस्पंदन

धनंजय शेट्ये

**जानेवारीला तुला पाहिले,**
**फेब्रुवारीला ओळख झाली,**
**मार्च-एप्रिल वसंत प्रेमाचा,**
**मे महिना हा मुहूर्त लग्नाचा!**

हे गाण्याचे बोल ऐकताच मे महिन्यात लग्नाचे मुहूर्त जास्त का असतात याचा अंदाज येतो. शालेय विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टी असतात. कामधंदा, व्यवसायाच्या निमित्ताने शहरी भागात राहणारा गोतावळा सुट्टीत गावी आलेला असतो.पै पाहुणे नातेवाईकांना मे महिन्यातील लग्नं ही सोयीस्कर ठरतात. त्यामुळे 'लग्नात आमंत्रण दिले' 'पण आले नाहीत!' यामुळे होणारे रुसवे फुगवे टाळले जातात.

खेडेगावात घराच्या अंगणात खळ्यात होणारी लग्नं म्हणजे अवर्णनीय आनंद असतो. लग्न असलेल्या वाडीत घरचं कार्य समजून आपुलकीने सामुदायिकपणे सर्व तयारी केली जाते. साखरपुडा ,गोड जेवणापासून ते परत लग्नाच्या आधी पाच ते सहा दिवस वाडीतल्या माणसांसाठी घरी जेवण केले लग्नघरातच सार्वत्रिक जेवण केले जाते.माडाच्या विनलेल्या झावळांनी मांडव सजवला जातो.

बेडल्या माडांच्या पानांनी मांडव सजवला जातो.लग्नाचे गाव निमंत्रण हे वाडीतील माणसे अगदी नारळ व तांदूळ देऊन घरच्या लग्नाप्रमाणे निमंत्रण करतात फक्त ठराविक मान्यवर व नातेवाईकांना यजमान परत स्वतः जाऊन अगत्याचे निमंत्रण देऊन येतात. हे सारं वातावरण विलोभनीय असते, जिव्हाळ्याचे असते.एखाद्या घरची परिस्थिती बेताची असल्यास सर्व कार्य त्याच जोमाने सुरू असते फक्त प्रत्येकजण आपापल्या घरी जेवण करून मदतीसाठी येतो पण सामाजिक कार्यात आपुलकीने, आत्मियतेने सहकार्य केले जाते. लग्नघरात आदल्या रात्री संपूर्ण रात्रभर स्त्रिया ओव्या रचून गात असतात.

त्या ओव्यामध्येही वधू पक्ष व वर पक्ष एकमेकांच्या खोड्या काढत असतात.'ओवी' गाण्याची एक अलौकिक परंपरा आहे.मुलीची सासरी पाठवणी (बोळवण) करताना जणू घरचीच मुलगी सासरी चालली आहे. अशा आविर्भावात अख्खी वाडी हमसून हमसून रडत असते.तो जिव्हाळा आपलेपणा हॉलवरच्या लग्नात अनुभवायला मिळत नाही.

आहेर पाकिटे चिकटविण्यासाठी लग्नमंडपाशेजारील परड्यातील फणसाच्या झाडाच्या पानांचा चिकट डिंक तिथल्या वापरला जात असे.सायकलच्या कॅरियरला मोठी पत्र्याची पेटी असलेला आयस्क्रूटवाला तिथे आवर्जून यायचा.दोन-तीन रुपयाला साधा तर पाच- दहा रुपयावाला कॅडबरी आयस्क्रूट मुंबईकर पाहुणे द्यायचे.एकदा तर बाबांनी दिलेले आहेर पाकिट मी माझ्या मित्राकडे ठेवायला दिले होते. या मित्राने त्या आहेराच्या पैशातूनच मला व स्वतः ला कॅडबरी आयस्क्रूट दिला होता हे घरी आल्यावर समजले होते.

लग्नाचे जेवण वाडीतील माणसे विनामोबदला बनवितात, पाहुण्यांना जिव्हाळ्याने जेवण बनवून वाढतात. ही सर्व व्यवस्था संपूर्ण वाडीवर असते.खरंतर ही सामाजिक परतफेड असते, आपलेपणाचा ओलावा असतो; प्रत्येकाच्या घरी कोणते ना कोणते सामाजिक कार्य असतेच ना! लग्नानंतर पाचव्या दिवशी किंवा बुधवारी किंवा रविवारी नॉनवेजच्या दिवशी 'पाचपर्तावण' आयोजित केले यात 'सासरी व माहेरी' अशा दोन्ही ठिकाणी मांसाहारी जेवणाची जय्यत मेजवानी असते. लग्नाच्या पंगतीत पुन्हा श्लोक बोलण्यावरून वधूपक्ष व वरपक्ष यांच्यामध्ये शाब्दिक खडाजंगी होत असते. तीच गोष्ट मंगलाष्टक बोलतानाही घडते. दोन्ही पक्षांकडचे घडशी सनई-चौघडा वाद्य आणि आणि एकमेकांच्या स्पर्धा! कोण सुरीने वाजवतो तर कोण डोक्याने बेंजो वर वाजवतो. थोडक्यात काय तर ही सर्व मजा फक्त आणि फक्त घरच्या अंगणात पार पडणाऱ्या लग्नात अनुभवता येते.

वरातीच्या वेळी फक्त नाचगाण्याचा धिंगाणा नसतो तर अनेक साहसी खेळ सादर केले जातात. मल्लखांब ,दांडपट्टा चालवणे, तलवार चालवणे, लाठीकाठी असे दर्जेदार साहसी खेळ लग्नाच्या वरातीत निसर्गरम्य परिसरात सादर केल्या जातात. वाडी वाडीची मंडळ असतात त्यांना बिदागी द्यावी लागते. पण काही म्हणा कोकणची गावात घरच्या मंडपात होणारी लग्न म्हणजे एक सार्वत्रिक सोहळाच असतो. आयुष्यभर डोळ्यात साठवून ठेवावा असा नयनरम्य सोहळाच जणू! **



# निवडणुकीच्या प्रचारात एकमेकांची उणीधुणी काढण्याची स्पर्धा !

अंकुश शिंगाडे

**जो नेता गेल्या लोकसभा निवडणुकीत एका पक्षाचा प्रचार करत होता तोच नेता यंदा जाहीर सभांतून त्याच पक्षाचे वाभाडे काढताना दिसतो आहे. अशा पक्षबदलू मंडळींच्या जुन्या ध्वनिचित्रफिती निवडणुकांच्या काळातच सामाजिक माध्यमांतून व्हायरल केल्या गेल्याने त्या पाहणाऱ्यांचे चांगलेच मनोरंजन घडत आहे.**

लोकसभा निवडणुकांचे २ टप्पे पार पडले असले, तरी अनेक ठिकाणच्या निवडणुका अद्याप शेष असल्याने प्रचाराला आता अधिक गती येऊ लागली आहे. सर्वच पक्षातील नेतेमंडळी आजमितीला रस्त्यावर उतरून प्रचाराला लागली आहेत, मोठमोठ्या रॅली निघत आहेत, हजारोंच्या सभा घेतल्या आहेत. खाणे-पिणे, विश्रांती या सर्वांकडे दुर्लक्ष करून आज प्रत्येक राजकीय नेता जीवघेण्या उन्हातही प्रचारासाठी राब राब राबतो आहे. सोबत कार्यकर्त्यांचा फौजफाटाही तितक्याच प्रमाणात झिजतो आहे. समस्त भारतभूमीला आज रणांगणाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. युद्धात ज्याप्रमाणे रथी शत्रुपक्षातील रथीशी आणि महारथी महारथीसोबत लढतो त्याप्रमाणे पक्षाची वरिष्ठ मंडळी अन्य पक्षांच्या वरिष्ठांना लक्ष करत आहेत तर राज्य स्तरावरील मंडळी समोरील पक्षाच्या राज्यस्तरावरील प्रमुखाला टीकेचा धनी करत आहेत. एकमेकांची उणीधुणी काढताना अनेक जण पातळ्या ओलांडत आहेत. गेल्या दोन वर्षांत राज्यातील राजकारणात अनेक स्थित्यंतरे झाल्याने कधीकाळी एखाद्यावर विश्वास टाकून खाजगीत सांगितलेल्या गोष्टी आज प्रचारसभांतून चव्हाट्यावर मांडल्या जात आहेत. सत्तेत आल्यावर आम्ही नागरिकांसाठी काय काय करू हे सांगण्यापेक्षा समोरच्या पक्षातील मंडळी किती भ्रष्ट आणि खोटारडी आहेत याबाबतच्या गोष्टी रंगवून सांगण्यामध्ये राजकीय नेत्यांना यावेळी अधिक स्वारस्य जाणवते आहे. सर्वच पक्षांच्या सभांमध्ये आज हेच चित्र दिसून येत आहे. टीका करताना अनेक नेतेमंडळी शत्रुपक्षाच्या नेतेमंडळींच्या खासगी आयुष्यातील घटनांनाही विनाकारण उगाळताना दिसून येत आहेत. एकाने टीका केली म्हणून त्याला उत्तर देण्यासाठी समोरील पक्षाचा नेताही तितकीच जहरी टीका करण्याचा प्रयत्न करताना दिसतो आहे. वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी या वाकयुद्धामुळे निर्माण झालेल्या भडक्यात तेल ओतण्याचे काम करत आहेत. अनेक ठिकाणी सभांमध्ये व्यासपीठावर आणि प्रेक्षकांमध्ये महिलावर्ग उपस्थित आहे याचेही भान नेतेमंडळींना राहिलेले दिसत नाही. जो नेता गेल्या लोकसभा निवडणुकीत एका पक्षाचा प्रचार करत होता तोच नेता यंदा जाहीर सभांतून त्याच पक्षाचे वाभाडे काढताना दिसतो आहे. अशा पक्षबदलू मंडळींच्या जुन्या ध्वनिचित्रफिती निवडणुकांच्या काळातच सामाजिक माध्यमांतून व्हायरल केल्या गेल्याने त्या पाहणाऱ्यांचे चांगलेच मनोरंजन घडत आहे.



सामान्य जनतेला निवडणुकांच्या माध्यमातून देशाला योग्य नेतृत्व द्यायचे आहे आणि आपल्या विभागाची काळजी घेणारा, लोकांच्या हाकेला धावून येणारा, विभागातील जनतेची कामे करणारा, जनतेच्या समस्या सोडवणारा, विभागाचा विकास घडवून आणणारा, आपल्या मतदानक्षेत्राशी कृतज्ञतेने वागणारा खासदार निवडायचा आहे. जनता सुज्ञ असल्याने ती योग्य तो निर्णय घेऊन आपल्या विभागातून योग्य उमेदवार निवडून आणणारच आहे. राजकीय सभांतून केल्या जाणाऱ्या टीकाटिपणीशी, आरोप प्रत्यारोपांशी सामान्य जनतेला काहीच देणेघेणे नाही तरीही राजकीय पक्ष इतरांची उणीधुणी काढण्यात अधिक स्वारस्य का दाखवत आहेत ? राज्याच्याच राजकारणाचा विचार केल्यास गेल्या वीस वर्षांत राज्यातील जनतेने सर्वच राजकीय पक्षांना राज्याची सत्ता चाखण्याची संधी दिली आहे, त्यामुळे कोणाची किती पात्रता आहे. कोणता पक्ष आणि कोणता नेता भ्रष्ट आहे आहे, कोणाला जनतेची काळजी आहे याबाबत नागरिकांचा चांगलाच अभ्यास झाला आहे. त्यामुळे राजकीय नेत्यांनी इतरांवर टीकाटिपणी करून आपली पात्रता लोकांसमोर उघडी करण्याऐवजी येणाऱ्या पाच वर्षांत देशाच्या पर्यायाने समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी, बाह्य आणि देशांतर्गत सुरक्षेसाठी, नागरिकांची शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारणेसाठी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी आणि त्यांच्या विकासासाठी, महागाई आटोक्यात आणण्यासाठी, लोकसंख्या नियंत्रणासाठी, आणि देशात सुराज्य आणण्यासाठी काय प्रयत्न करणार याबाबत ठामपणे आणि प्रतिज्ञापूर्वक सांगितल्यास त्यांच्याप्रती नागरिकांचा विश्वास निर्माण होण्याची संधी अधिक बळावू शकते. स्वातंत्र्यपूर्व काळात नेताजी सुभाषबाबूंनी 'तुम मुझे खून दो मैं तुम्हे आजादी दूंगा' म्हणताच क्षणी लाखोंच्या संख्येने तरुण पुढे आले. महात्मा गांधींनी 'चले जाव' ची हाक देताच लाखो देशभक्तांच्या समूह गांधीजींच्या नेतृत्वाखाली एकवटला. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या मार्गदर्शनाखाली देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या तरुणांचा प्रचंड मोठा गट पुढे आला. इंग्रजांनी नागरिकांवर किती अत्याचार केले याचा केवळ पाढा न वाचता त्या इंग्रजांना देशातून हाकलून लावण्यासाठी लढा उभारून जनतेला त्यात सहभागी होण्याचे आवाहन करणारी असंख्य थोर मंडळी या देशात होऊन गेली. या मंडळींच्या नेतृत्वाखाली अनेकांनी आपल्या घरादारावर तुळशीपत्र ठेवले, कित्येकांनी आपल्या प्राणांचीही बाजी लावली. या मंडळींनी घेतलेल्या पुढाकारामुळे आणि केलेल्या त्यागामुळे आज आपण स्वातंत्र्याची फळे चाखतो आहोत. या सर्वांचे एकच ध्येय होते आणि ते म्हणजे या मातृभूमीला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करून स्वातंत्र्य आणणे. आज किती राजकीय पक्षांचे ध्येय देशात सुराज्य आणण्याचे आहे आणि कीतींचे ध्येय सत्तेचा मलिदा लाटण्याचे आहे हे जनता चांगलेच ओळखून आहे. **

**जगातील अनेक कंपन्यांनी कोविडची लस बनवली. त्यापैकी 'एस्ट्राजेनेका' ही एक कंपनी होती. 'कोविशिल्ड' नावाची कोरोना प्रतिबंधक लस तयार करणाऱ्या याच कंपनीने नुकतेच आपल्याकडून निर्मित लसीमुळे लोकांवर काही दुष्परिणाम होऊ शकत असल्याचे मान्य केले. यामुळे रक्त गोठण्याची शक्यता असल्याचे कंपनीने म्हटले आहे. सदर वृत्तानंतर ही लस घेतलेल्यांमध्ये भीतीचे वातावरण असून अधिक खुलासा गरजेचा आहे.**

# भय संपलेले नाही...

उर्मिला राजोपाध्ये

बराच काळ उलटल्यानंतरही कोरोनाच्या दुख:द स्मृती कायम आहेत. या जीवघेण्या साथरोगाने घराघराला दिलेले जीवघेणे हादरे आठवणींद्वारे आजही जाणवत असल्याचा भास होतो. कोरानाआधीचे जग आणि करोना नंतरचे जग अशा दोन तुकड्यांमध्ये काळाची विभागणी होत असल्यामुळे या आजाराचे गांभीर्य जाणवत राहते. त्याविषयीची चर्चा होत राहते. याच पार्श्वभूमीवर सध्या कोरोना लशीच्या दुष्परिणामांचा विषय चर्चेत आहे. कोव्हिशिल्ड या लशीच्या वापराने काही गंभीर धोके उद्‌भवू शकत असल्याचे खुद्द लसनिर्मिती करणाऱ्या कंपनीने मान्य केल्यामुळे ऐन उन्हाळ्यात शंकेचे ढग दाटून आले नसते तरच नवल. सहाजिकच या लसीचे दुष्परिणाम नेमके कोणते, त्याची लक्षणे कोणती आणि लस घेणाऱ्यांच्या जीवाला धोका उद्‌भवण्याची शक्यता नेमकी किती याविषयी लोकांचे अनेक प्रश्न आहेत.

जगातील अनेक कंपन्यांनी कोविडवर लस बनवली आहे. त्यापैकी एक एस्ट्राजेनेका ही कंपनी होती. कोविशिल्ड नावाची कोरोना प्रतिबंधक लस तयार करणाऱ्या याच एस्ट्राजेनेकाने नुकतेच कबूल केले की आपल्याकडून निर्मित लसीमुळे लोकांवर काही दुष्परिणाम होऊ शकतात. यामुळे रक्त गोठण्याची शक्यता असल्याचे कंपनीने म्हटले आहे. इथे हे लक्षात घेण्याजोगे आहे की, भारतातील लोकांना कोविड लसीचे सुमारे दोन अब्ज २१ कोटी डोस देण्यात आले आहेत. भारतातील तब्बल ९३ टक्के लोकांना कोरोनाची लस देण्यात आली आहे. त्याच वेळी जगात या लसीचे दोन अब्ज ५० कोटीपेक्षा जास्त डोस वितरित केले गेले आहेत. २०२१ मध्येच युरोपियन मेडिसिन एजन्सीने एस्ट्राजेनेकाच्या लसीमुळे २२२ लोकांमध्ये रक्त गोठल्याची तक्रार असल्याचा अहवाल दिला होता. म्हणजेच त्यावेळी लाखातील एकाला हा धोका होता. तेही युरोपियन देशांमध्ये हे प्रमाण बघायला मिळाले होते. रक्त गोठण्याच्या समस्येबाबत भारतालाही माहिती होती आणि त्यावर देखरेख करण्यात आली होती, असे आता सांगितले जात आहे. मात्र फायद्याचा आकडा मोठा आणि तोटा नगण्य असल्यामुळे त्यावर त्यावेळी फारसे भाष्य केले गेले नाही. आता मात्र नव्याने हा विषय ऐरणीवर आला आहे.

कोरोनाची लस घेतल्यानंतर किती काळ वेदना होऊ शकतात, असे त्यावेळी सांगण्यात आले होते. कोणतीही लस दिल्यानंतर हे दुष्परिणाम समोर येतात. सहाजिकच या मानसिकतेतून त्यावेळी लोकांनी छोट्या मोठ्या तक्रारींकडे दुर्लक्ष केले. कारण लसीकरणानंतरच्या काही घटना या धोययाचे स्पष्ट निर्देश देत होत्या. त्याचप्रमाणे, भारत सरकारने दीर्घकाळ कोरोना लसीकरणाचे निरीक्षण केल्याचेही समोर येत होते. त्यांनी यासंबंधीचे पोर्टल तयार केले. समिति स्थापन केली. हे वेळोवेळी पाहायला मिळाले. मात्र आता ताज्या बातम्यांनंतर भारताच्या कोविशिल्डवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तज्ज्ञांच्या मते, त्याचा इतका दीर्घ परिणाम होत नाही. कोणतीही समस्या उद्भवल्यास ती एकतर लस दिल्यानंतर लगेच दिसून येते किंवा महिना ते दीड महिन्यांनंतर परिणाम दिसू लागतो. प्रभाव दिसत असला तरीही भारतात लसीकरणानंतर अईएफआयची टक्केवारी ०.००७टक्के आहे. त्यामुळे आता घाबरण्यासारखे काही नाही.

भारत सरकारने कोरोना लस बाहेर आल्यानंतर अईएफआय पोर्टल तयार केले. यासोबतच अईएफ समितीही स्थापन करण्यात आली. या समितीने शेवटचा अहवाल मे २०२२ मध्ये सादर केला होता. हा अहवाल कोरोनाची लस घेतल्यानंतर गुंतागुंत झाल्याची तक्रार होती त्यांच्याबद्दल होता. त्यामुळे समस्या फक्त कोविशिल्डचीच नाही तर स्फुटनिक, कोवॅयिसन आणि कोर्बिवॅयस चीही होती. या लसी घेतल्यानंतर लोकांनी समस्यांबद्दल तक्रार केली होती. आताही इंटरनेटवर गेल्यानंतर, तुम्ही की वर्ड टाकून ही कागदपत्रे देखील पाहू शकता. या पार्श्वभूमीवर धोका व्यक्त करण्यात आलेली रक्त गोठण्याची समस्या नेमकी काय आहे, हेदेखील समजून घ्यायला हवे. रक्ताच्या गुठळ्या होण्याच्या स्थितीला 'थ्रोम्बोसिस' म्हणतात आणि ही स्थिती शरीरात कोठेही निर्माण होऊ शकते. जसे की शिरा, धमन्या किंवा हृदयाच्या आतदेखील रक्ताच्या गुठळ्या होऊ शकतात. त्यामुळे शरीरातील अवयवांमध्ये रक्त नीट जात नाही. स्वाभाविकच संबंधित अवयवांचे काम बाधित होते आणि आरोग्यविषयक गंभीर समस्या निर्माण होतात. रक्त गोठणे टाळण्यासाठी जीवनशैलीत काही बदल केले जाऊ शकतात. थ्रोम्बोसिसमुळे हृदयविकाराचा झटका, ब्रेन स्ट्रोक आणि प्लेटलेट्स कमी होण्याचा धोका वाढतो.




'कोविशिल्ड' बद्दल ज्या प्रकारचे दावे केले जात आहेत ते आधीच माहिती होते, तथापि, फायद्यांच्या तुलनेत, नुकसानाची टक्केवारी खूपच कमी होती. किंबहुना, ती नगण्य मानली गेली होती. त्यामुळेच ही लस देणे सुरू ठेवण्यात आले. सीरम इन्स्टिट्यूटच्या म्हणण्यानुसार, लस घेतल्यानंतर तुम्हाला मूर्च्छा येण्याची किंवा चक्कर येण्याची समस्या होऊ शकते. याशिवाय हृदयाचे ठोके बदलणे, डास घेण्यास त्रास होणे किंवा डास घेताना शिट्टीचा आवाज येणे अशी समस्या असू शकते. ओठ, चेहरा किंवा घसा सुजण्याची समस्या देखील दिसू शकते. कंपनीचे म्हणणे आहे की, लसीकरणानंतर एकाच वेळी एकापेक्षा जास्त दुष्परिणामही दिसू शकतात. यामध्ये स्नायू किंवा सांधे दुखणे, डोकेदुखी यांचा समावेश होतो. या स्थितीत तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घेण्याचा सल्ला कंपनीने दिला आहे. अर्थात या समस्या १० पैकी एकाला होऊ शकतात, असेही कंपनीचे म्हणणे आहे. त्याचबरोबर कंपनीने असेही म्हटले आहे की, इंजेक्शनच्या ठिकाणी सूज किंवा लालसरपणा येणे; ताप, उलट्या किंवा जुलाब, हात आणि पाय दुखणे किंवा खूप ताप येणे, घसा खवखवणे, नाक वाहणे, खोकला किंवा थरथरणे देखील येऊ शकतात. त्यामुळे अशी लक्षणे दिसल्यास कोणत्याही प्रकारची लस घेतल्यानंतर घाबरुन जाण्याचे कारण नाही. ही सगळी लक्षणे तात्पुरती असतात. कोणतीही उपचार न घेता काही दिवसांमध्ये ती कमी होतात. अर्थातच लक्षणांची तीव्रता अधिक असेल आणि ती बराच काळपर्यंत जाणवत असतील तर मात्र संबंधितांनी डॉक्टरांची मदत घ्यायलाच हवी.

याच सीरम इन्स्टिट्यूट म्हणजेच भारतातील कोविशील्ड लस बनवणाऱ्या कंपनीने ऑगस्ट २०२१ मध्येच ही माहिती दिली असल्याचेही स्पष्ट केले आहे. कंपनीचे म्हणणे आहे की, थ्रोम्बोसाइटोपेनिया सिंड्रोम एक लाखांपैकी एकापेक्षा कमी व्यक्तींमध्ये आढळण्याची शययता आहे. त्यामुळेच आता कोणतीही लस घेतलेली असेल तरीही लोकांनी घाबरण्याचे करण नाही. सध्या चर्चेत असणारे 'कोविशिल्ड'चे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले होते. याचिकाकर्त्यांने ही मागणी केली होती. त्यावर वरील सगळा आणि सविस्तर खुलासा केल्यानंतर आमची सहानुभूती लसीचे दुष्परिणाम जाणवलेल्या लोकांबरोबर असल्याचे कंपनीने मान्य केले आहे. खेरीज तुम्हाला पहिला डोस मिळतो तेव्हा धोका सर्वाधिक असतो, असेही कंपनीने स्पष्टीकरण देताना सांगितले आहे. दुसऱ्या डोससह तो कमी होते आणि तिसऱ्या डोससह सर्वात कमी होतो, असेही तज्ज्ञांचे म्हणणे आहे. काही शास्त्रज्ञांनी असेही म्हटले आहे की, लस घेतल्यानंतर सुरुवातीच्या दोन ते तीन महिन्यांत कोणतेही दुष्परिणाम दिसून येऊ शकतात. मात्र या धोक्यांना घाबरुन वा लक्षणांकडे अतिप्रमाणात लक्ष देऊन लसीकरण थांबवण्याचा वा कमी करण्याचा उपाय योग्य ठरत नाही. सततच्या अभ्यास आणि संशोधनातून धोक्यांची वा लक्षणांची संख्या कमी होत असते.

ज्याने आपल्या प्रियजनांना गमावले आहे किंवा आरोग्य समस्यांची तक्रार केली आहे अशा प्रत्येकासाठी आमची सहानुभूती आहे. रुग्णांच्या सुरक्षिततेला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे आणि लसींसह सर्व औषधांचा सुरक्षित वापर सुनिश्चित करण्यासाठी नियामक प्राधिकरणांकडे स्पष्ट आणि कठोर मानके आहेत, असे ॲस्ट्राझेनेकाच्या प्रवक्त्याने एका निवेदनात म्हटले आहे. एकीकडे या प्रकरणी असे वाद-प्रतिवाद होत आहेत. मात्र या वादाच्या दरम्यान समाजवादी पक्षाने भाजपने कोविड-१९ लसीच्या निर्मात्याकडून कमिशन घेतले होते, असा आरोप केला. याव्यतिरिक्त, त्यांनी लसीकरण केंद्रावर देशातील लोकांना चुकीची लस दिल्याचाही आरोप केला. दिल्लीचे आरोग्य मंत्री सौरभ भारद्वाज यांनीही कथित दुष्परिणामांचे निराकरण करण्यासाठी केंद्राने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी केली आहे. **

## वाचनीय आणि स्फोटक

# वाळूचे किल्ले

प्रा.शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

'वाळूचे किल्ले' ही अविनाश कोल्हे यांची कादंबरी डिंपल पब्लिकेशनने देखण्या रूपात प्रकाशित केली आहे. ही कादंबरी अविनाश कोल्हे यांनी श्रीभाऊंच्या स्मृतीस अर्पण केली आहे. या निमित्ताने त्यांनी 'माणूस' चे दिवस, या शीर्षकान्वये आपल्या सविस्तर आठवणी मांडल्या आहेत. सप्टेंबर,१९८० मध्ये अविनाश पुणे सोडून मुंबईकर झाले. तरीदेखील त्यांचे पुण्याला प्रा.स.शि.भावे सरांना भेटण्यासाठी जाणे-येणे सुरू होते. त्यांच्याशी बोलताना श्री. ग. माजगावकर यांच्यासंबंधी बोलणे होत असे. १९८५ मध्ये 'माणूस'च्या रौप्य महोत्सवी वर्षी पुण्यात झालेल्या कार्यक्रमात श्रीभाऊ यांनी निवृत्त होण्याविषयी मनोगत मांडले होते. भावे सरांनी 'माणूस' ची जबाबदारी घेण्याविषयी अविनाश यांना विचारले. त्यानंतर जानेवारी १९८७ पासून 'माणूस' त्रैमासिक स्वरूपात प्रकाशित करण्याचे ठरले. दरवर्षी दिवाळी अंकासह चार विशेषांक, अविनाश यांनी १९९१ पर्यंत संपादित केले. त्यावेळचे विविध अनुभव अविनाश यांनी सविस्तरपणे नोंदविले आहेत. या कादंबरीचे देखणे, रंगीत मुखपृष्ठ सतीश भावसार यांचे आहे. ही कादंबरी लहानमोठ्या आठ प्रकरणांतून वाचकांसमोर उलगडते.




रागिणी ठाकरे-पाटीलने बॉम्बे लॉ कॉलेजमध्ये, बी. ए. पूर्ण केल्यावर, पहिल्या वर्षाला प्रवेश घेतलाआहे. अभ्यासू रागिणी न्या. गजेंद्र गडकर वक्तृत्व स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी, मार्गदर्शनासाठी ज्येष्ठ ग्रंथपाल संतोष म्हात्रे यांना भेटते. हुषार रागिणी काय वाचते आहे, याची ते सखोल चौकशी करतात. इंग्रजी ग्रंथांचे वाचन करण्यास मार्गदर्शन करतात. नंतर कॅन्टीनमध्ये म्हात्रे तिची ओळख काही विशेष, मार्गदर्शक प्राध्यापकांशी वेळोवेळी करून देतात. संतोष म्हात्रे यांनीही कायद्याची पदवी घेतली आहे. संतोष म्हात्रे रागिणीचे ज्येष्ठ मित्र आणि मार्गदर्शक होतात. त्यांच्या तिच्याकडून खूप काही अपेक्षा आहेत.

सावळ्या रंगाच्या, बुटक्या रागिणीला आपल्या रूपाचा न्यूनगंड असल्याने, ती वेळोवेळी उदास होते. मासिक पाळीचा तिला खूप त्रास होतो. बॉयफ्रेंड नाही ही तिची खंत आहे. भरपूर अभ्यास करून ती उत्तम गुणांनी उत्तीर्ण होते. हळूहळू रागिणी प्रॅक्टिस मध्ये रमते. २०१० साली मुंबई हायकोर्ट स्थापनेच्या दीडशेव्या वर्षी, बार कौन्सिलद्वारे झालेल्या कार्यक्रमात ती आयत्यावेळी, आत्मविश्वासाच्या जोरावर सूत्रसंचालन करण्यात यशस्वी होते. तिच्या बरोबरच्या मैत्रिणी संसारात रमल्याचे कळले की, ती उदास होते. वधूवर सूचक मंडळात नाव नोंदवूनही तिचे लग्न ठरविण्यात तिचे आई-वडील, अन्य नातेवाईक यशस्वी होत नव्हते. तिचे फॅमिली डॉक्टरही तिला लग्न करण्याचा सल्ला देतात. एलएलएमची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर, प्रॅक्टिस ऐवजी रागिणी विविध लॉ कॉलेजमध्ये शिकवू लागते. परंतु नेट/सेट न केल्याने तिला केलेल्या कष्टांचा पुरेपूर आर्थिक लाभ मिळत नाही. लॉ कॉलेजमध्ये शिकवण्यात ती रमली आहे. विद्यार्थीही तिच्या शिकविण्यावर खुश आहेत. म्हात्रे तिला वेळोवेळी, नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होण्याचा, योग्य सल्ला देतात. वधूवर सूचक मंडळातून तिला बंगलोरच्या कार्डिओलॉजिस्ट डॉ. आशिष बाविस्करची माहिती मिळते. दोघांचे मोबाईलच्या माध्यमातून रात्रीचे दीर्घकाळ चॅटिंग सुरू होते. आशिषचे प्रशिक्षण सुरू आहे. त्याच्या मित्रांशी चाललेल्या गप्पांतून तो लग्न करण्यास इतक्यात तयार नाही. मात्र रागिणीशी शरीरसंबंध ठेवण्यास तयार आहे.

रागिणी आशिषशी लग्न करून, बंगलोरला जाण्याची स्वप्ने पाहत आहे. आई-वडील पुण्याचे मामा-मामी यांना फसवून, खोटी कारणे सांगून पुण्याला एका हॉटेलमध्ये काही तास, दिवसभर आशिषसह ती वेळ घालवते. त्यानंतर काही काळानंतर लोणावळ्याला दोघे पुन्हा, एका हॉटेलमध्ये रात्रभर राहतात. परंतु यशस्वी शरीरसंबंध साधण्यात त्यांना यश येत नाही. पुन्हा एकमेकांना न भेटण्यासाठी ते परस्परांचा निरोप घेतात. म्हात्रेंना हे शेवटी नाईलाजाने सांगितल्यावर ते रागिणीला खूप रागावतात,दोष देतात. मे महिन्याच्या सुट्टीत ती वर्ध्याला मामांकडे जाते. नागपूरच्या विवेक पैठणकर या वकिलाशी तिची ओळख करून दिली जाते. विवेकजवळ ती थोडी फटकून वागते. त्याचा घटस्फोट झाल्याचे तिला माहीत आहे. मुंबईकर रागिणीच्या बोलण्याने सुरुवातीला विवेक जरा तिला घाबरतो. मात्र हळूहळू तिला तो पसंत पडतो. साखरपुडा होऊन नंतर त्यांचे साधेपणाने लग्न होते. नंतर नागपूरवासी रागिणी, नवऱ्यासह सप्टेंबरमध्ये युरोपला हनिमूनसाठी जात असल्याची गुड न्यूज म्हात्रेंना कळवते. दुःखी रागिणी सुखी होत आहे, हे कळल्याने संतोष म्हात्रे खुश होतात.

या कादंबरीतून वाचकांसमोर येणाऱ्या घडामोडी प्रामुख्याने पाच वर्षांतील आहेत (२०१३पर्यंत). मुंबईतील इंग्रजी-मराठी संमिश्र भाषा, वाढत्या वयाच्या युवा पिढीच्या लैंगिक प्रेरणा, त्याविषयीचे त्यांचे अनेक गैरसमज आणि अज्ञान हे सारे सुजाण वाचकांना जाणवते. मद्यपान, धूम्रपान इ. व्यसने, सुशिक्षित,उच्चभ्रू समाजात, तरुण आणि प्रौढ व्यक्तींमध्ये वाढत असल्याचे जाणवते. सुखासीन, चैनीच्या जीवनाला चटावलेल्या यातील पात्रांच्या कथानकातून, त्यावेळच्या आणि आताच्या समाजाचे ''स्फोटक दर्शन'' या कादंबरीतून घडते आहे. पुस्तकाच्या मलपृष्ठावर लेखकाचे रंगीत छायाचित्र आणि या कादंबरीचे सार दिले आहे. पुस्तकातील राहून गेलेले काही मुद्रणदोष खटकतात. **

**पुस्तकाचे नाव : वाळूचे किल्ले**
**लेखक :अविनाश कोल्हे**
**प्रकाशक : डिंपल पब्लिकेशन,**
**९८२०७४८०८१/९२२६९३७९२४**
**प्रथमावृत्ती : २६ जानेवारी २०२४**
**पृष्ठे : २२८. मूल्य : रु. ३५०/**



# पहाटेच्या गप्पा अर्थात स्वत:शीच!

शशिकांत मुद्देबिहाळकर
९७६७१५२६०८

पहाटेचे साडेतीन चार वाजले की अंथरुणावर लोळत पडून रहाणं शक्य होत नाही. आधी किती वाजले हे बघण्याचे वेध तीन वाजल्यापासूनच लागतात. सारखे घड्याळ बघणे हा एक चाळाच लागतो. ईतर सूर्यवंशी मंडळींची क्षमा मागून मी उठतोच. मुखमार्जन आटपून मग आदल्या दिवसाचं काही वाचायचं, लिहायचं राहिलं असल तर ते आधी हातात घेतो नाहीतर मग जे सुचेल ते लिहायला घेतो. काहीतरी धार्मिक पठण वाचन करावं हे मनात येतं पण का कुणास ठाऊक त्यात मन रमत नाही.ते थोडफार केलंय. खरंतर हे वय तेच करण्याचं आहे असं समवयस्क सांगतात पण मला मात्र काही हलकं फुलकं लिहावंसं वाटतं. कोणी वाचो किंवा न वाचो सतःचं मन तर स्फटिकासारखं मोकळं होतं. व्यक्त होण्यानं मनाचा निचरा होतो असं मला वाटतं.

पुर्वी सारखा व्यायाम आता होत नाही. तसं शरीर,तंदुरूस्त राहिलंय तेवढं आता पुरे. फारश्या व्याधी कधी नव्हत्याच, त्यामुळे आता स्वयं सुखाय, स्वत:शीच बोलण्याचं ठरवलंय. तो वेळ आयुष्यात आपण कधी देत नाही. नेहमीच दुसऱ्याचं दु:ख समजून घेऊन धडपडण्यात वेळ गेला. त्याचा उपयोग झाला की नाही तो विचार कधी केला नाही. आता जगणं स्वत:साठीच हे या सरत्या आयुष्यात ठरवलंय तरी. बघू या कितपत जमतंय. फटफटीत उजाडेपर्यंत स्वतःच्याच विश्वात रमायचं, मग थोडं मोकळ्या हवेत तासभर निसर्गातील गमती जमती बघायच्या अर्थात हा व्यायाम म्हणून नव्हे.

एक गोष्ट या लिखाणाचा एक भाग म्हणून गत आयुष्यातील काही प्रसंग पुन्हा लिहून काढायचे. ते सगळे स्वगतच आहे. डायरीच्या चोपड्या सन १९६६ पासून लिहिलेल्या आहेत. त्यांची उजळणी होईल आणि आपणच आपलं लिहिलेलं बायोपीक तयार होईल. आपण कसे जगलो त्यांचं एक त्रैराशिक मांडता येईल. त्यात लक्ष घालणाऱ्यांना ते समजेल तरी किंवा इतरांना एक फाटकं आयुष्य कसं असतं ते समजेल. त्यातील चढउतार समजतील. त्यामधील कटू आयुष्य मी लिहायचं टाळणार आहे. हे बायोपिक एका अगदीच छोट्या माणसाचं असेल. ते आत्मकथन असेल आत्मचरित्र नव्हे. कारण त्यात चारित्र्याइतका मोठा शब्द कदाचित नसेल ती एक स्वत:चीच खरी गोष्ट असेल. स्वत:ला सांगितलेली. साडेपाच वाजले. बाहेर अजून उजाडतंय. एक फक्कडसा चहा करून घेतो आणि निघतो पाय, मोकळे करायला.**

# एकाच पुस्तकाची आत्मकथा


निलेश साठे

अरे... ये ... ये... बाळांनो अरे माझ्याकडे लक्ष द्या. अरे मी इथे आहे. कपाटात. अरेरे काय तुम्ही काय ते कसलं यंत्र आलं आहे. मोबाईल का फोबाईल. अरे भ्रमणध्वनी म्हणतात त्याला. पण तुम्ही त्याचा असा इतका वापर करू नका रे. त्रासदायक आहे ते. तुमच्या डोळ्यांना किती त्रास होतो हे लक्षात येतंय का तुमच्या. अरे ऐका माझं. आवश्यक तेवढाच वापर करा रे त्याचा. त्याच्या आहारी जाऊ नका. कसं समजावू रे तुम्हाला. ती दीदी तिकडे एका कोपऱ्यामध्ये बसलेय. काहीतरी टायपिंग करते. मध्येच खुदकन हसतेय. माझ्याकडे कोणाचे लक्ष नाही. थांबा तुमचे बाबा येऊ द्या तुमच्या बाबांना सांगून...... पण त्यांना तरी सांगून काय फायदा. ते सुद्धा हेच करतात. बघावं तेव्हा नुसते मोबाईल मध्ये असतात. ते बघा आलेच. आहेच त्यांच्या कानाला फोन. कोणाशी बोलतात कोणास ठाऊक. अरे त्यांना सांगा मान दुखेल तुमची. बॅग टाकली कपडे बदलले आणि बसले परत फोनवर बोलत. तुमचं बाबांच्या कडे लक्ष नाही बाबांचं तुमच्याकडे लक्ष नाही. ती म्हातारी तिकडे कोपऱ्यात एकटीच बसली आहे.

> **मी किती भाग्यशाली आहे असं मला वाटायचं. तुम्ही एक एक पान चाळत पुढे जायचा एक एक पान पलटायचा तेव्हा मला स्वत:ला आयुष्यातल्या पुढच्या टप्प्यावर गेल्या सारख वाटायचं.पण आता असं नाही होतं रे. तुम्हाला माहित आहे का. ज्येष्ठ साहित्यिक प्रल्हाद केशव अत्रे यांच्या हस्ताक्षराने मी पावन झालेलो आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा स्पर्श आणि सहवास मला लाभलेला आहे. अनेक ख्यातनाम व्यक्तींच्या सानिध्यात येऊन मी स्वत: पावन झालेलो आहे.**

अरे बाळांनो, नका ती लोकांची रिल्स बघत बसू. तुम्ही लोकांची रिल्स बघता त्यांना लाईक करता त्यांना पैसा मिळतो. तुम्हाला काय मिळतं. तुमच थोडा वेळ फक्त मनोरंजन होतं. बस्स. हवं तर तुम्ही स्वतःच्या रिल्स बनवा. स्वतःची काहीतरी निर्मिती करा. स्वतः नावा रूपाला या. लोकांच्या रिल्स बघून तुम्हाला काही मिळणार नाही रे. अरे त्या मोबाईलचा चांगल्या कामासाठी वापर करा. स्वतःचा अमूल्य वेळ फुकट का वाया घालवता.. अरे यार तुम्ही माझं ऐकत का नाही. हॅलो माझा आवाज येतोय का तुम्हाला. कधी कधी वाटत मला हात असायला हवे होते तुमचे कानच उपटले असते. अरे तुम्हाला माहित आहे का जेव्हा हे यंत्र तुमच्या हातामध्ये नव्हतं तेव्हा तुम्ही माझ्यावर किती प्रेम करायचा. मला कपाटात अगदी वरच्या ठिकाणी ठेवायचा. कुठेही असे फेकून देत नव्हता. चुकून जर लाथ लागली तर पाया पडायचा. मान सन्मानाने पुन्हा व्यवस्थित ठिकाणी ठेवून द्यायचा. तुम्ही जेव्हा मला अलगद हातात घ्यायचा तेव्हा माझ्या अंगावर शहारे यायचे. माझं संपूर्ण अंग रोमांचित होऊन जायचं. मी किती भाग्यशाली आहे असं मला वाटायचं. तुम्ही एक एक पान चाळत पुढे जायचा एक एक पान पलटायचा तेव्हा मला स्वत:ला आयुष्यातल्या पुढच्या टप्प्यावर गेल्या सारख वाटायचं.पण आता असं नाही होतं रे. माझ्याकडे कोणी पाहत सुद्धा नाही. तुम्हाला माहित आहे का . ज्येष्ठ साहित्यिक प्रल्हाद केशव अत्रे यांच्या हस्ताक्षराने मी पावन झालेलो आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा स्पर्श आणि सहवास लाभलेला आहे मला. अनेक ख्यात नाम व्यक्तींच्या सानिध्यात येऊन मी स्वतः पावन झालेलो आहे. अनेकांचे आयुष्य मी घडवलेल आहे. कितीतरी लेखकांनी माझ्याकडून प्रेरणा घेतली आहे व स्वतःचे आयुष्य उज्वल बनवलं आहे. काय आणि किती आठवनी तुम्हाला सांगू. तुम्ही माझं रूपांतर त्या मोबाईलमध्ये करून घेतलय पण त्यावर नजर फिरवली का कधी? नाही.

आता ती दीदी का उठली मध्येच. फोनवर बोलत ती बाहेर का गेली. अरे दाद्या तिचं बोलणं ऐकायला तू का तिच्या मागे जातो आहेस. बोलू दे की तिला मनसोक्तपणे. पण मग तिला असं काय बोलायचं असेल कि ती तुमच्यासमोर बोलेना.बाहेर जाऊन बोलू लागली आहे. बर ती काय आणि कोणाशी बोलत असेल. बरं तिचं बोलने तू चोरून ऐकणे हे चुकीचं आहे दाद्या. हे काम मम्मी-पप्पाच आहे. चल तू ये.



ती बघ . स्वयंपाक घरातून मम्मी बाहेर आली. आता तिला..... अरे बापरे ... अरे बापरे ... ती काय करतेय. अच्छा सेल्फी काढतेय. काढा बाई सेल्फी काढा तुम्ही का मागे राहायचं. तुमच्या सुद्धा हातात ते मोबाईल का फोबाईल आलेला आहे. काढा... अजून सेल्फी काढा. अरे वा काय छान फोटो आलाय. डावीकडून फोटो काढला उजवीकडून फोटो काढला सगळे केस मागे घेऊन फोटो काढला सगळे केस एका बाजूला घेऊन फोटो काढला आता आणखीन किती फोटो काढते अग बाई बस कर. अग अग बस कर.

घरामध्ये पाच डोकी आहेत. पण कोणाचा कोणाला ताळमेळ नाही. कोणीही एकमेकाशी बोलत नाही. प्रत्येकाने मोबाईलमध्ये डोकं खूपसलं आहे. किती विचित्र परिस्थिती आहे. पाच माणसं एकत्र आहेत. पण कोणाशी कोणाचा संवाद होत नाही. सगळे चिडीचिप आहेत. कधी कधी वाटतं हा मोबाईल सगळी नाती संपून टाकेलं की काय. मोबाईलचा वापर चांगल्या कामासाठी करा. वेळ वाया घालवण्यासाठी वापर नका करू. तुमची अत्यावश्यक कामे आहेत ती करा. त्यातून काही कमाई करता येते का ते पहा. गरजेपुरताच वापर करा. ठेवा तो फोन बाजूला. हसा खेळा बागडा संवाद साधा बोला. माणसं आहात तुम्ही माणसासारखा वागा. हे जीवन पुन्हा पुन्हा नाही रे बाबांनो.

दाद्याची मुंडीवर होईना. काय टाईप करतोय काय माहित काय कळेना भी. ती दीदी भी आत आली तिचाही फोन चालूच आहे. मम्मी ची सेल्फी काढणे संपेना. बाबांचं कोणाशी हितगुज चालू आहे. ती म्हातारी तिकडे एकटीच बसली आहे. मला आठवतंय मला शेवटचा स्पर्श या म्हातारीचाचं झालेला. मी असं एका कोपऱ्यात कुठेतरी पडलेला मला या म्हातारीनेच उचललं अरे हे कोणाचं पुस्तक आहे असं म्हणून तिने मला या कपाटात ठेवलंय ते आजतागायत कपाटातच पडून राहिलो आहे. काही दिवस मी असाच इथे पडून राहील. नंतर मला रद्दीमध्ये विकलं जाईल. माझा एक एक पान कोणीतरी टराटरा फाडेल. ते एक एक पान फाटत असताना जणू माझं काळीजचं फाटलं जाईल. माझी वेदना मी कोणाला सांगू. कोणी ऐकणार तरी आहे का. माझी आणि त्या म्हातारीची व्यथा एक सारखीच आहे नाही का ग आजे? **

निवडक

## गिल बनला कोच

**मुंबई :** आयपीएलच्या सतराव्या हंगामाचा थरार रंगला आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरूद्धच्या सामन्यापूर्वी गिल भारतीय महिला क्रिकेट संघाची खेळाडू हरलीन देओलला फलंदाजीचे धडे देताना दिसला. शुबमन आणि हरलीन यांचा हा व्हिडीओ फ्रँचायझीने शेअर केला आहे. हरलीन महिला प्रीमिअर लीगमध्ये गुजरातच्या फ्रँचायझीचा भाग आहे. पण, दुखापतीमुळे ती सध्या क्रिकेटपासून दूर आहे. आयपीएलच्या यंदाच्या हंगामात गुजरातचा संघ संघर्ष करत आहे.

## उन्मुक्तचे स्वप्न भंगले

**अमेरीका :** ट्वेंटी-२० विश्वचषकासाठी अमेरिकेचा संघ जाहीर झाला आहे. अमेरिकेने आपल्या १५ सदस्यीय संघाची घोषणा केली असून, मोनांक पटेलकडे नेतृत्व सोपवण्यात आले आहे. भारतातून अमेरिकेत स्थायिक झालेला क्रिकेटपटू उन्मुक्त चंदला मात्र संघात स्थान मिळाले नाही. मात्र, विशेष बाब म्हणजे भारताला अंडर-१९ विश्वचषक जिंकवून देणारा उन्मुक्त चंद या स्पर्धेला मुकला आहे. त्याला अमेरिकेच्या संघात स्थान मिळाले नसल्याने त्याचे विश्वचषक खेळण्याचे स्वप्न भंगले आहे.

## नाणेफेकीवर प्रश्नचिन्ह

**मुंबई :** मुंबई इंडियन्स संघ पुन्हा नाणेफेकीवरून वादात सापडला आहे. शुक्रवारी कोलकाता नाइट रायडर्सविरुद्धच्या नाणेफेकीदरम्यान कॅमेऱ्यात नाणे न दिसल्याने लोकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. मुंबईचा कर्णधार हार्दिक पंड्याने वानखेडेवर कोलकाताविरुद्ध नाणेफेकले, त्यानंतर श्रेयस अय्यरने प्रमुखांना बोलावले, परंतु सामनाधिकारी म्हणाले की टेल आले होते. म्हणजेच हार्दिकने नाणेफेक जिंकली आहे. मात्र, कॅमेरा नाण्यापर्यंत पोहोचण्याआधीच रेफ्रींनी नाणे उचलून निर्णय दिला होता.

## पांड्या ढिसाळ कर्णधार

**मुंबई :** ३ मे रोजी झालेल्या सामन्यात, कोलकाता नाइट रायडर्सने मुंबई इंडियन्सचा २४ धावांनी पराभव केला. पण निकालापेक्षाही या सामन्याचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे हार्दिक पांड्याचा ढिसाळ कर्णधार आणि केकेआरच्या गोलंदाजांची अप्रतिम कामगिरी. एकेकाळी मुंबईची अवस्था कोलकात्याची झाली होती. पण, पंड्या या आयपीएलचा सर्वात वाईट कर्णधार असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले.मुंबई इंडियन्सचा ११ सामन्यांमधील हा आठवा पराभव असून तो नवव्या स्थानावर आहे.

## पर्पल कॅप नटराजनकडे

**मुंबई :** सनरायझर्स हैदराबादचा वेगवान गोलंदाज टी नटराजन, जो मैदानात अतिशय शांत दिसत होता, त्याने पर्पल कॅप जिंकली आहे. वास्तविक, पर्पल कॅप धारकाच्या शर्यतीत नटराजनने जसप्रीत बुमराहचा पराभव केला आहे.नटराजन सध्या या आयपीएलमध्ये सर्वाधिक १५ विकेट घेणारा गोलंदाज बनला आहे. ३३ वर्षीय नटराजनने २०२०-२१ ऑस्ट्रेलियन दौऱ्यात भारतासाठी तिन्ही फॉरमॅटमध्ये पदार्पण केले. यॉर्कर मॅन म्हणून आपली छाप सोडलेल्या नटराजनने ब्रिस्बेनच्या गाब्बा स्टेडियमवर ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी पदार्पण केले.

# संघ निवडीत मोठा पक्षपात

**। मुंबई । वार्ताहर ।**

**वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत होणाऱ्या टी २० विश्वचषकासाठी भारतीय संघाची घोषणा झाली आहे. संघ जाहीर होताच त्यावर प्रतिक्रिया येत आहेत. माजी क्रिकेटपटू आणि निवड समितीचे माजी अध्यक्ष कृष्णमाचारी श्रीकांत यांनी या निवडीवर नाराजी व्यक्त केलीय. २०११ साली विश्वचषक विजेतेपद पटकावणाऱ्या भारतीय संघाची निवड श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखालील समितीनेच केली होती. त्यानंतरच्या १३ वर्षांमध्ये भारतीय संघाला फक्त एका आयसीसी स्पर्धेचे विजेतेपद पटकावता आलेलं आहे. श्रीकांत यांनी निवड समिती पक्षपाती असल्याचा आरोप केला आहे.**



### ■ निवड समिती माजी अध्यक्षांचा आरोप

टी २० विश्वचषक २०२४ च्या संघामध्ये चेन्नई सुपर किंग्सचा कर्णधार ऋतूराज गायकवाडचा समावेश न केल्यानं श्रीकांत संतापले आहेत. ऋतुराज या आयपीएलमध्ये सातत्यानं रन्स करतोय. त्यानंतरही त्याची विश्वचषकासाठी निवड झालेली नाही. त्यामुळे श्रीकांत नाराज आहेत. शुभमन गिलचा राखीव खेळाडूंमध्ये समावेश केल्याबद्दलही त्यांनी नाराजी व्यक्त केलीय. त्यांनी संघ व्यवस्थापनावर पक्षपाती असल्याचा आरोप केला. गिल कोणत्याही प्रकारात चांगला खेळत नसतानाही त्याला संधी मिळत होती, असं श्रीकांत यांनी म्हटले आहे.

श्रीकांतने त्याच्या यूट्यूब चॅनलवर सांगितले, शुभमन गिल पूर्णपणे आऊट ऑफ फॉर्म आहे. तरीही त्याची टीममध्ये का निवड केलीय? ऋतुराज गायकवाड दावेदार आहे, यामध्ये कोणतीही शंका नाही. त्यानं १७ इनिंगमध्ये ५०० पेक्षा जास्त रन काढले आहेत. त्याचबरोबर त्यानं ऑस्ट्रेलियाविरुद्ध शतकही झळकावलंय.शुभमन गिल निवड समितीचा आवडता खेळाडू आहे. तो फेल गेला तरी त्याला संधी मिळते. टेस्ट, वन-डे आणि टी मध्ये अयशस्वी होऊनही त्याला जागा मिळाली आहे. निवडीमध्ये मोठा पक्षपात आहे.चेन्नई सुपर किंग्सचा कॅप्टन ऋतुराज गायकवाड या सिझनमध्ये भन्नाट फॉर्ममध्ये आहे. त्यानं १० मॅचमध्ये ६३.६३ च्या सरासरीनं आणि १४६.६८ च्या स्ट्राईक रेटनं ५०९ रन काढले आहेत. यामध्ये एक शतक आणि चार अर्धशतकांचा समावेश आहे. गायकवाड ऑरेंज कॅपच्या शर्यतीमध्ये आघाडीवर आहे. तर गिलनं या सिझनमध्ये साधारण कामगिरी केलीय. त्यानं १० मॅचमध्ये ३५.५६ च्या सरासरीनं ३२० रन केले आहे. यामध्ये त्याचा स्ट्राईक रेट १४०.९६ असून त्यानं दोन अर्धशतक झळकावले आहेत.

**टी २० वर्ल्ड कपसाठी टीम इंडिया :** रोहित शर्मा (कॅप्टन), यशस्वी जयस्वाल, विराट कोहली, सूर्यकुमार यादव, ऋषभ पंत (विकेटकिपर), संजू सॅमसन (विकेटकिपर), हार्दिक पांड्या, (व्हाईस कॅप्टन), शिवम दुबे, रविंद्र जाडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, युजवेंद्र चहल, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज आणि अर्शदीप सिंह

**राखीव खेळाडू :** शुभमन गिल, रिंकू सिंह, खलील अहमद, आवेश खान

## कसोटी क्रमवारीत भारताची दुसऱ्या स्थानी घसरण

# ऑस्ट्रेलियाचा भारताला धक्का

**। मुंबई । वार्ताहर ।**

नवी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने वार्षिक क्रमवारी जाहीर केली. यामध्ये ऑस्ट्रेलिया कसोटी क्रिकेटमध्ये अव्वल स्थानावर आहे, तर भारताने एकदिवसीय आणि टी २० या दोन्ही प्रकारांमध्ये आपला दबदबा कायम ठेवला आहे.

गतवर्षी ओव्हल येथे झालेल्या जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या विजेतेपदाच्या सामन्यात विद्यमान कसोटी विजेत्या ऑस्ट्रेलियाने भारतावर २०९ धावांनी शानदार विजय नोंदवला होता. त्यामुळे भारताला मागे टाकून कसोटी क्रम वारीत ऑस्ट्रेलियाने अव्वल स्थान पटकावले आहे. कसोटी क्रमवारीत भारताची दुसऱ्या स्थानावर घसरण झाली आहे. पण वनडे आणि टी २० मध्ये भारताने आपले अव्वल स्थान टिकवून ठेवले आहे. कसोटी क्रमवारीत अव्वल असलेल्या ऑस्ट्रेलियाचे आता १२४ गुण आहेत. तर भारतीय संघ ४ गुणांनी मागे असून १२० गुणांसह दुसऱ्या स्थानी आहे. यादीत तिसऱ्या स्थानी इंग्लंड (१०५), चौथ्या दक्षिण आफ्रिका (१०३), न्यूझीलंड (९६) पाचव्या, पाकिस्तान (८९) सहाव्या, श्रीलंका (८३) सातव्या, वेस्ट इंडिज (८२) आठव्या आणि बांगलादेश (५३) नवव्या स्थानी विराजमान आहे. वार्षिक अपडेटमध्ये २०२०-२१ हंगामातील निकाल वगळण्यात आले आहेत आणि मे २०२१ नंतर पूर्ण झालेल्या सर्व मालिका समाविष्ट केल्या आहेत.

२०२०-२१ मध्ये भारत ऑस्ट्रेलियाशी २-१ असा जिंकला होता. पण भारताचा हा विजय या क्रमवारीत ग्राह्य धरला जात नसल्याने भारित दुसऱ्या स्थानावर घसरला आहे. क्रमवारीत स्थान मिळवण्यासाठी संघांना तीन वर्षांत किमान आठ कसोटी सामने खेळावे लागतात.दरम्यान, भारत वनडे आणि टी२० आंतरराष्ट्रीय क्रमवारीत अव्वल आहे. यामध्ये मे २०२३ पूर्वी पूर्ण झालेल्या सामन्यांसाठी ५० टक्के गुण आणि त्यानंतर पूर्ण झालेल्या सामन्यांसाठी १०० टक्के गुणांचा समावेश आहे. भारत १२२ गुणांसह अव्वल तर ऑस्ट्रेलिया ११६ गुणांसह दुसऱ्या स्थानी आहे. तिसऱ्या स्थानावर दक्षिण आफ्रिका (११२), चौथ्या स्थानी पाकिस्तान (१०६), पाचव्या स्थानी न्यूझीलंड (१०१), सहाव्या स्थानी इंग्लंड (९५), सातव्या क्रमांकावर श्रीलंका (९३), आठव्या स्थानी बांगलादेश (८६), नवव्या स्थानी अफगाणिस्तान आणि दहाव्या स्थानी वेस्ट इंडिजचा संघ आहे. टी २० आंतरराष्ट्रीय क्रमवारीत भारत २६४ गुणांसह अव्वल आहे.

## आता टी २० विश्वचषकाचे वेध

**। अमेरीका। वृत्तसंस्था ।**

ग्रॅमी पुरस्कार विजेते कलाकार सीन पॉल आणि सुपरस्टार केस यांनी आयसीसी टी २० विश्वचषक २०२४ साठी आऊट ऑफ धिस वर्ल्ड हे अँथम रिलिज केलं आहे. स्पर्धा सुरू होण्याच्या ३० दिवस आधी हे अधिकृत गाणं रिलिज करण्यात आलं.

मायकेल टॅनो मोंटानो यांनी संगीतबद्ध केलेलं हे गीत संगीत व्हिडिओसह लाँच करण्यात आलंय. या गाण्यामध्ये आठ वेळचा ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता उसेन बोल्ट, वेस्ट इंडिजचा क्रिकेट आयकॉन ख्रिस गेल, शिवनारायण चंद्रपॉल, अमेरिकेचा गोलंदाज अली खान आणि स्टेफनी टेलर या खेळातील काही मोठ्या नावांचा समावेश आहे.

# भारतीय रिले संघाचा लागणार कस

**। नौसाऊ । वृत्तसंस्था ।**

पॅरिस ऑलिंपिकसाठी रिलेचे तिकीट पक्के करण्यासाठी भारताच्या रिले संघाला पूर्ण ताकद लावावी लागणार आहे. कारण उद्यापासून बहामा येथे सुरू होत असलेल्या दोन दिवसीय जागतिक रिले स्पर्धेतून अव्वल १४ संघ थेट पॅरिससाठी पात्र ठरणार आहेत. भारतीय संघ पुरुष व महिलांच्या ४-४०० मीटर तसेच मिश्र ४-४०० मीटर रिले शर्यतीत सहभागी होत आहे.

भारतीय संघाला सर्वाधिक आशा पुरुषांच्या ४-४०० रिले संघाकडून आहे. यात अमोल जेकब, आरोक्य राजीव, राजेश रमेश, नोह निर्मल टोम, महम्मद अजमल, महम्मद अनस, अविनाश कुमार आणि यशास यांचा समावेश आहे. गेल्यावर्षी बुडापेस्ट येथे झालेल्या जागतिक स्पर्धेत अनस, अमोल जेकब, अजमल व राजेश रमेश या चौकडीने २ मिनीटे ५९.०५ सेकंदाचा नवीन आशियाई व राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित करताना अंतिम फेरी गाठली होती.अंतिम फेरीत भारतीय संघाला पाचव्या स्थानावर समाधान मानावे लागले होते.

एकूण चार हीट होतील व प्रत्येक हीटमधील अव्वल दोन संघ दुसऱ्या दिवशी होणाऱ्या अंतिम फेरीसाठी व पॅरीससाठीही पात्र ठरतील. पहिल्या दिवशी पात्र ठरू न शकलेले २४ संघ दुसऱ्या दिवशी पुन्हा तीन हीटमध्ये सहभागी होतील व त्यातील अव्वल दोन संघ अशा प्रकारे एकूण १४ संघ पॅरिससाठी पात्र ठरतील. अशी प्रक्रिया पाचही रिले शर्यतीसाठी होईल.पुरुषांच्या ४-४०० मीटर शर्यतीत ऑलिंपिक विजेता स्टिव्हन गार्डनरचा समावेश असलेला यजमान बहामा, जागतिक इनडोअर स्पर्धेतील विजेता असलेला अलेक्झांडर डूमचा समावेश असलेला बेल्जियम, बोट्सवाना, फ्रान्स, अमेरिका, पोलंड हे संघ पदकाचे दावेदार आहेत. महिलांच्या ४-४०० रिले शर्यतीत विश्वविजेते नेदरलँड प्रबळ दावेदार असून त्यांची मदार फेमके बोल वर आहे.याशिवाय पोलंड, अमेरिका, जमैका, कॅनडा, नायजेरिया यांच्यातही चुरस आहे.

भारतीय संघालाही पसंती मिळाली असून त्यात ज्योतिका, अनुभवी पूवम्मा, महाराष्ट्राची ऐश्वर्या मिश्रा, प्राची, आशियाई क्रीडा स्पर्धेत मिश्र रिलेत सुवर्णपदक जिंकणारी वित्या रामराज, सुबा वेंकटेशन आणि जागतिक ज्युनिअर स्पर्धेतील ब्राँझपदक विजेती रूपल चौधरी यांचा समावेश आहे. मिश्र रिले शर्यतीतही भारतीय संघाला अंतिम १४ संघात स्थान मिळवून पॅरिसचे तिकीट पक्के करण्याची संधी आहे.

**एकूण खेळाडू ८९३**
**सहभागी देश ५४.**

**पुरुष**
- ४-१०० मीटर - ३२ संघ
- ४-४०० मीटर - ३२ संघ

**महिला**
- ४-१०० मीटर - ३० संघ
- ४-४०० मीटर - २७ संघ

**मिश्र**
- ४-४०० मीटर - ३०

## वेस्ट इंडिजच्या खेळाडूवर बंदी

**। मुंबई। वृत्तसंस्था ।**

वेस्ट इंडिजचा यष्टिरक्षक फलंदाज डेव्हॉन थॉमस याच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक संहितेअंतर्गत पाच वर्षांची बंदी घालण्यात आली आहे. श्रीलंका क्रिकेट, अमिराती क्रिकेट बोर्ड आणि कॅरिबियन प्रीमियर लीगच्या भ्रष्टाचारविरोधी संहितेच्या सात प्रकरणांचे उल्लंघन केल्याचे मान्य केल्यामुळे थॉमसवर पाच वर्षांची बंदी घातली गेली आहे. आयसीसीने संबंधित संहिता अंतर्गत नियुक्त भ्रष्टाचार विरोधी अधिकारी म्हणून त्याच्या क्षमतेनुसार अपात्रतेचा कालावधी घोषितकेला.अपात्रतेचा कालावधी हा मागील १८ महिन्यांपासून सुरू केला जाईल असा निर्णय दिला.

# मालिका एकतर्फी जिंकण्याची सुवर्णसंधी

**। सिलहट । वृत्तसंस्था ।**

स्मृती मानधना (४७ धावा) व शेफाली वर्मा (५१ धावा) यांची दमदार फलंदाजी व राधा यादव, श्रेयांका पाटील, पूजा वस्त्रकार, रेणूका सिंग यांनी केलेल्या प्रभावी गोलंदाजीच्या जोरावर भारतीय महिला क्रिकेट संघाने येथे झालेल्या तिसऱ्या टी-२० लढतीत यजमान बांगलादेश संघावर सात विकेट व नऊ चेंडू राखून विजय मिळवला आणि पाच सामन्यांच्या मालिकेत ३-० अशी विजयी आघाडी घेतली. शेफाली वर्मा हिची सामन्याची मानकरी म्हणून निवड करण्यात आली.

बांगलादेशकडून भारतीय महिला संघासमोर ११८ धावांचे आव्हान उभे ठाकले. स्मृती मानधना व शेफाली वर्मा या सलामी जोडीने ९१ धावांची भागीदारी करताना भारताच्या विजयाची भक्कम पायाभरणी केली. दोघांनी बांगलादेशच्या गोलंदाजांचे आव्हान लीलया परतवून लावले. शेफालीने ३८ चेंडूंमध्ये आठ चौकारांसह ५१ धावांची खेळी साकारली. रितू मोनीच्या गोलंदाजीवर ती बाद झाली. त्यानंतर मानधना हिला आपले अर्धशतक झळकावता आले नाही. नाहिदा अख्तेर हिने तिला ४७ धावांवर बाद केले. कर्णधार हरमनप्रीत कौर व रिचा घोष यांनी विजयावर शिक्कामोर्तब केले.

# भारत-दक्षिण आफ्रिका खेळणार

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

दक्षिण आफ्रिकन महिला क्रिकेट संघ यावर्षी भारत दौऱ्यावर मालिका खेळायला येणार आहे. भारत-दक्षिण आफ्रिका यांच्यामध्ये कसोटी, एकदिवसीय व टी-२० सामन्यांची मालिका खेळवण्यात येणार आहे.



एकदिवसीय व टी-२० मालिका बंगळूरमध्ये, तर कसोटी चेन्नईमध्ये खेळवण्यात येणार आहे. भारत-दक्षिण आफ्रिका या दोन देशांमध्ये १६ जूनपासून तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेला सुरुवात होणार आहे. चेन्नईमध्ये २८ जूनपासून एकमेव कसोटीला सुरुवात होईल. त्यानंतर

### ■ कसोटी अन् टी-२० मालिका

०५, ०७ व ०९ जुलै रोजी बंगळूरत टी-२० मालिकेचा थरार रंगणार आहे. सप्टेंबर महिन्यात महिलांचा टी-२० विश्वकरंडक खेळवला जाणार आहे. भारतीय महिला क्रिकेट संघाच्या सरावासाठी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध टी-२० मालिकेचे आयोजन केले आहे.बीसीसीआय व दक्षिण आफ्रिकन क्रिकेट मंडळाच्या पुढाकाराने दोन देशांमध्ये एकमेव कसोटीचे आयोजन करण्यात येणार आहे.

## माथिशाचा धोनीला वडिलांचा दर्जा


**मुंबई :** चेन्नई सुपर किंग्जकडून खेळणारा श्रीलंकेचा गोलंदाज पाथिराना यानं महेंद्रसिंह धोनीची खूप प्रशंसा केली आहे. त्याने धोनीला आपल्या वडिलांसारखं म्हटले आहे.पाथिराना म्हणाला, माझ्या वडिलांनंतर माझ्या क्रिकेट कारकिर्दीत धोनीच माझ्या पित्याची भूमिका निभावत आहेत. ते नेहमी काळजी घेतात आणि सातत्यानं काय करावं याचा सल्ला देतात. पाथिरानानं धोनीद्वारे मिळणाऱ्या मार्गदर्शनाबद्दल बोलताना सांगितलं की, जेव्हा मी मैदान किंवा मैदानाबाहेर असतो तेव्हा ते मला खूप साऱ्या गोष्टी सांगत नाहीत. ते फक्त छोट्या-छोट्या गोष्टी सांगतात, त्यामुळे खूप फरक पडतो आणि मला विश्वासही मिळतो.

# क्रिकेटपटू जोश बेकर याचे निधन

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

इंग्लंड क्रिकेटसाठी हृदयद्रावक बातमी समोर आली आहे. जोश बेकर या प्रतिभावान क्रिकेटपटूचे २ मे रोजी वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी निधन झाले. जोश डाव्या हाताने फिरकी गोलंदाजी करायचा. त्यांच्या मृत्यूचे कारण अद्याप समोर आलेले नाही.तो वूस्टरशायर क्रिकेट क्लबकडून खेळायचा. १ मे रोजी त्याने एका सामन्यात ३ बळी घेतले होते. इंग्लंड संघाचा कसोटी कर्णधार बेन स्टोक्सशीही त्याचे विशेष नाते होते.

वूस्टरशायर क्लबने जोश बेकरच्या मृत्यूवर भाष्य करण्यास नकार दिला आहे. बेकरच्या कुटुंबाच्या गोपनीयतेचा आदर केला पाहिजे, असे क्लबने आपल्या निवेदनात म्हटले आहे. त्यांच्या निधनाने क्लबला धक्का बसला आहे, असे इंग्लंड क्रिकेट बोर्डाचे मुख्य कार्यकारी ॲशले गिल्स यांनी सांगितले.गिल्स म्हणाले, जोश यांच्या निधनाच्या बातमीने आम्हाला धक्का बसला आहे. जोश हा एक सहकारी होता, तो आमच्या क्रिकेट कुटुंबाचा अविभाज्य भाग होता, आम्ही सर्व त्याची खूप आठवण काढू.



बेकरने २०२१ मध्ये वयाच्या १७ व्या वर्षी क्लबसोबत पहिला करार केला.

त्याने २२ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ४३ विकेट्स आणि २५ पांढऱ्या चेंडू सामन्यांमध्ये २७ बळी घेतले. जोश बेकर हा एक उदयोन्मुख अष्टपैलू खेळाडू होता, त्याने जुलै २०२३ मध्ये ग्लुसेस्टरशायरविरुद्ध कारकिर्दीतील सर्वोत्तम ७५ धावा केल्या आणि दोन अर्धशतके झळकावली. तो इंग्लंडच्या अंडर-१९ संघाकडूनही खेळला आहे.

बुधवार (१ मे) रोजीच, ब्रॉम्सग्रोव्ह स्कूलमध्ये सॉमरसेट विरुद्ध वूस्टरशायरच्या चार दिवसीय दुसऱ्या चॅम्पियनशिप सामन्याच्या पहिल्या डावात त्याने ६६ धावांत ३ बळी घेतले. मात्र, अंतिम दिवशी सामना लवकर रद्द करण्यात आला. तथापि, बेकर २०२२ मध्ये प्रकाशझोतात आला, जेव्हा बेन स्टोक्सने त्याच्या एका षटकात ३४ धावा दिल्या. त्यानंतर स्टोक्सने त्याच्या षटकात पाच षटकार आणि एक चौकार लगावला. मात्र, नंतर स्टोक्सने त्याला व्हॉट्सॲपवर मेसेज पाठवून प्रोत्साहन दिले.

## प्राइम टेबल टेनिस स्पर्धा

# स्पिनएक्सट्रीमने पटकावले विजेतेपद

**। पलावा सिटी । वृत्तसंस्था ।**

**स्पिनएक्सट्रीमने प्राइम टेबल टेनिस सीझन-२ चे विजेतेपद पटकावले आहे. अंतिम सामन्यात स्पिनएक्सट्रीमने क्लिपर्सवर ६-५ असा विजय मिळवला. महाराष्ट्रातील पलावा शहरातील ऑलिम्पिक स्पोर्ट्स सेंटर येथे अंतिम सामन्याचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ८ संघातील अव्वल ५६ खेळाडूंचे मजबूत कौशल्य पाहायला मिळाले.**

चॅम्पियनशिप सामन्यातील पहिला गेम मिश्र दुहेरीचा होता, ज्यामध्ये च्या सिद्धेश आणि मानसी यांनी क्लिपर्सच्या झुबिन आणि श्रुतीचा पराभव केला. सिंगल्समध्ये चुरशीची स्पर्धा पाहायला मिळाली, क्लिपर्सच्या पार्थ मगरने इशान खांडेकरला कमी फरकाने पराभूत केले, तर स्पिनएक्सट्रीमच्या नैशा रेवसकरने रितिका मधुरवर विजय मिळवला. यामुळे स्पिनएक्सट्रीम संघ २-१ ने पुढे गेला.

टीम क्लिपर्सने जोरदार पुनरागमन केले आणि सिद्धांत देशपांडेने शर्वेया सामंतचा पराभव करून गुणसंख्या २-२ अशी बरोबरी साधली. त्यानंतर राधिका सकपाळने सना डिसूझाला हरवून आघाडी मिळवली. गोल्डन सिंगल्समध्ये, ने २-१ ने जिंकून स्कोअर ४-४ असा बरोबरीत केला. त्यानंतर गेम ५ मध्ये सिद्धेश पांडेने झुबिन तारापोरवालाचा पराभव करून स्पिनएक्सट्रीमला ५-४ अशी थोडीशी आघाडी मिळवून दिली.

टीम क्लिपर्सच्या श्रुती अमृतेने संयम राखत मानसी चिपळूणकरचा पराभव करून गुणसंख्या ५-५ अशी बरोबरी साधली.

त्यानंतर निर्णायक गेममध्ये च्या मनीष रावतने क्लिपर्सच्या ओंकार जोगचा सहज पराभव करून आपल्या संघाला चॅम्पियन बनवले. आणि या दोघांनी उपांत्य फेरीत आपले वर्चस्व दाखवले. ने टीम सेन्सेशन्सचा ६-२ ने पराभव केला आणि क्लिपर्सने टीम किंग पोंग विरुद्ध ६-१ ने वर्चस्व गाजवले, ज्यामुळे तीव्र फायनल मॅचअपसाठी स्टेज सेट केला.



# अकोल्याची यवतमाळवर, तर वाशिमची गोंदियावर मात

**। अकोला । वृत्तसंस्था ।**

जिल्हा हौशी क्रिकेट संघटना अकोला व अकोला क्रिकेट क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने येथे आयोजित व्हीसीए टी-२० आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेत गुरुवार, २ मे रोजी पार पडलेल्या दोन सामन्यांमध्ये अकोला संघाने यवतमाळ संघाला, तर वाशिम संघाने गोंदिया संघाला पराभूत केले. अकोला क्रिकेट क्लब मैदानावर खेळविल्या गेलेल्या पहिल्या सामन्यात यवतमाळ संघाने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला.

अकोला संघाने प्रथम फलंदाजी करत निर्धारित २० षटकांमध्ये आठ गड्यांच्या मोबदल्यात १९१ धावांचे लक्ष्य ठेवले. प्रत्युत्तरात यवतमाळ संघाला २० षटकांमध्ये ८ गडी गमावून केवळ १५९ धावाच करता आल्या. त्यामुळे संघाला ३२ धावांनी पराभव स्विकारावा लागला. या सामन्यात ७९ धावा करणारा अकोल्याचा कर्णधार वैभव लांडे हा सामानावीर ठरला. पंच म्हणून आशिष सोळंके व संजय बुंदेले, तर स्कोअरर म्हणून निलेश लखाडे यांनी काम पाहिले.

उमरी येथील स्व. अरुण दिवेकर क्रिंडागणावर खेळविलेल्या गेल्या दुसऱ्या सामन्यात वाशिम संघाने नाणेफेकचा कौल जिंकत गोंदिया संघाला प्रथम फलंदाजीस पाचारण केले. गोंदिया संघाने निर्धारित षटकांमध्ये ८ गडी गमावत १४६ धावा उभारल्या. वाशिम संघाने १८.४ षटकांमध्ये केवळ चार गड्यांच्या मोबदल्यात १४७ धावांचे विजयी लक्ष्य गाठत सामना खिशात घातला. ३ बळी व ५२ धावा अशी अष्टपैलु कामगिरी करणारा वाशिमचा अध्ययन डागा हा सामनावीर ठरला. पंच म्हणून अनील एदलाबादकर व संदीप कपूर, तर स्कोअरर म्हणून सावरमल शर्मा यांनी काम पाहिले. विदर्भातील प्रतिष्ठेची मानल्या जाणाऱ्या स्पर्धेचे उद्घाटन येथील अकोला क्रिकेट क्लब मैदानावर विदर्भ क्रिकेट संघटनेचे जिल्हा समिती चेअरमन शरद पाध्ये यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नईम रज्जाक, चंद्रशेखर अत्राम, पंच समितीचे मंगेश खेळकर, जिल्हा संघटनेचे उपाध्यक्ष अशोक ढेरे, जावेद अली व भरत डिक्कर मंचावर उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयआेनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)